




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १६ • अंक ४ • शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com







## » थोडक्यात

### .....अन् चाललेत मिसिंग लिंकचा मुका घ्यायला

**मुंबई :** मुंबई-पुणे मिसिंग लिंकवरुन राजकीय वातावरण चांगलच तापलं असून, सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोपाचे राजकारण सुरू झालं आहे. नुकतेच राज्य शासनाचा महत्वकांशी प्रोजक्ट म्हणून पाहिले जात होते, त्या 'मिसिंग लिंक'वर दरड कोसळण्याची घटना घडली.या घटनेवरुन शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी टीका केली होती. या टीकेला प्रत्युत्तर देत भाजप आमदार गोपीचंद पडळकरांनी बोचऱ्या शब्दांत पलटवार केला आहे.

### वन जमिनींवरील घरांचे पुनर्वसन - महसूलमंत्री

**मुंबई :** राज्यातील सरकारी, वन जमिनी तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध प्राधिकरणांच्या जमिनींवर १ जानेवारी २०११पूर्वी उभारण्यात आलेल्या सर्व झोपड्यांना सरकार पूर्ण संरक्षण देणार आहे. या रहिवाशांचे एसआरए, म्हाडा किंवा इतर गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून योग्य पुनर्वसन केले जाईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी विधानसभेत केली.

'अकोट फाईल' बनले क्राईम कॅपिटल !

### हताश महिलेचा आत्महत्येचा इशारा!

# 'माझ्या आत्महत्येस अकोट फाईल पोलीस आणि शासन जबाबदार राहील'

## अवैध वरली-मटका जुगारामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त



प्रतिनिधी | १० जुलै

**अकोला:** शहरातील अकोट फाईल परिसर सध्या गुन्हेगारीचा अड्डा म्हणजेच 'क्राईम कॅपिटल' बनत चालल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या भागात सर्रासपणे सुरू असलेल्या अवैध वरली मटका आणि 'एक्का बादशाह' टेबलमुळे येथील मोलमजुरी करून जगणाऱ्या शेकडो गरीब नागरिकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत.

स्थानिक अकोट फाईल पोलिसांच्या 'अर्थपूर्ण' दुर्लक्षामुळे हा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून, विशेषतः त्रस्त महिलांकडून केला जात आहे. परिस्थिती इतकी हाताबाहेर गेली आहे की, एका तक्रारदार महिलेने थेट आत्महत्येचा इशारा देत, 'माझ्या आत्महत्येस अकोट फाईल पोलीस आणि शासन जबाबदार राहील' अशा आशयाचे निवेदन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिले आहे. तक्रारदार महिलेच्या नातेवाईकाने या विषयीची तक्रार सिटी न्यूज सुपरफास्ट च्या कार्यालयात आणून दिली. या संदर्भात अकोट फाईल पोलिसांशी दूरध्वनीवरून, ई मेल वर सिटी न्यूज सुपरफास्ट ने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही त्याच बरोबर पोलिस दलाची प्रतिक्रिया या विषयावर मिळाली नाही.

### उस्मान शाह उर्फ पीरच्या टेबलला कोणाचा वरदहस्त ?

» अकोट फाईल परिसरात उस्मान शाह उर्फ पीर नावाच्या व्यक्तीचा अवैध वरली मटका आणि लॉटरीचा व्यवसाय खुलेआम सुरू असल्याची चर्चा आहे. या बेकायदेशीर टेबलवर रोज १०० ते २०० लोकांची मोठी गर्दी असते. मोलमजुरी करून कमावलेले कष्टाचे पैसे लोक या जुगारात गमावत आहेत. तक्रारदार महिलेच्या मुलाचे देखील या टेबलवर लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. 'हा अवैध व्यवसाय पोलिसांना लाखोंचे हप्ते देऊन आणि राजकीय पाठबळाच्या जोरावरच सुरू आहे,' असा थेट आरोप मरणाची भीती न बाळगता या महिला तक्रारदाराने केला आहे.

### महिलांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

» अनेक घरांमध्ये कमावत्या पुरुषांना आणि तरुणांना या जुगाराचे व्यसन लागल्यामुळे घरात उपासमारीची वेळ आली आहे. महिलांना प्रचंड यातना सहन कराव्या लागत आहेत. या अवैध धंद्यांवर तात्काळ आणि कायमस्वरूपी बंदी न आल्यास, संतप्त महिलांनी तीव्र आंदोलनाचा आणि गंभीर पावले उचलण्याचा इशारा दिला आहे. आता या संपूर्ण प्रकरणावर अकोल्याचे पोलीस अधीक्षक , उपविभागीय पोलीस अधिकारी स्वतः लक्ष घालून या अकोट फाईल परिसरातील 'किंग' आणि अवैध चालकांवर स्वयंस्फूर्तीने कडक कारवाई करणार की स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईची वाट पाहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या विषयी महिला तक्रारदार असल्याने नाव गोपनीय ठेवण्यात आले आहे.

### तक्रार घेऊनही कारवाई शून्य ! पोलीस अधीक्षक लक्ष देणार का?

» या अवैध धंद्यांविरुद्ध स्थानिक महिलांनी एकत्र येऊन अकोट फाईल पोलीस स्टेशनसह थेट पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे लेखी तक्रारी केल्या आहेत. मात्र, एवढ्या गंभीर बाबींवरही अकोट फाईल पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. उलटपक्षी तक्रारींची दखलच घेतली जात नसल्याने, 'अकोट फाईलचे बीट जमादार, ठाणेदार यांचे या प्रकाराकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष आहे का ?' अशी विचारणा आता नागरिक करत आहेत.

# राम मंदिर प्रकरणी सर्वोच्च न्यायालय सुनावणी घेणार

वृत्तसंस्था | १० जुलै



**नवी दिल्ली :** अयोध्या येथील श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टशी संबंधित कथित आर्थिक अनियमिततेच्या स्वतंत्र चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय १३ जुलै रोजी सुनावणी घेणार आहे. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची व व्ही. मोहना यांचा समावेश असलेले खंडपीठ या प्रकरणांची सुनावणी घेईल.

या याचिकांमध्ये मंदिरात मिळालेल्या देणग्या आणि अर्पणांच्या व्यवस्थापनाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांनी सीबीआय चौकशी, विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना आणि ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांचा आढावा घेण्यासाठी एका स्वतंत्र तज्ज्ञ समितीच्या स्थापनेची मागणी केली आहे.

यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाने सुट्टीच्या काळात याचिकांवर लवकर सुनावणी घेण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली होती. अशाच प्रकारच्या दिलासासाठी अनेक याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयातही प्रलंबित आहेत. राज्य सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) केलेल्या तपासानंतर, उत्तर प्रदेश पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. सध्या या प्रकरणात आठ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या याचिकांपैकी एक याचिका नरेंद्र कुमार गोस्वामी यांनी दाखल केली आहे. या याचिकेत, त्यांनी श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या आर्थिक नोंदींची सीबीआय चौकशी आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यामार्फत ट्रस्टच्या खात्यांचे लेखापरीक्षण करण्याची मागणी केली आहे. दुसरी याचिका अजय कुमार राय आणि दिनेश कुमार यादव यांनी दाखल केली. त्यांनीही कथित आर्थिक अनियमिततेची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे. न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी आणि आर्थिक नोंदींचे लेखापरीक्षण करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

# ऑटो उलटून होमगार्डचा मृत्यू, चालक घटनास्थळावरून फरार

प्रतिनिधी | १० जुलै

**यवतमाळ :** पुसद तालुक्यातील काळी दौलत येथील पोखरी रोडवर भरधाव वेगाने धावणारा विना क्रमांकाचा तीनचाकी ऑटो पलटल्याने त्याखाली सापडून होमगार्ड जवानाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (९ जुलै) दुपारी घडली. या अपघातानंतर ऑटोचालक घटनास्थळावरून फरार झाला असून ग्रामीण पोलिसांनी वाहन जप्त करून त्याचा शोध सुरू केला आहे.

भीमराव शंकर इंगोले (वय ५७, रा. आदर्श नगर, पुसद) असे मृतकाचे नाव आहे. ते पुसद उपविभागातील होमगार्ड दलात कार्यरत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास इंगोले यांनी आपली दुचाकी पोखरी रोडवर रस्त्याच्या कडेला उभी केली होती. त्याचवेळी भरधाव वेगाने आलेला विना क्रमांकाचा तीनचाकी ऑटो चालकाचे नियंत्रण सुटल्याने पलटी झाला.



पलटलेला ऑटो थेट इंगोले यांच्या अंगावर पडल्याने ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ त्यांना पुसद येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच दुपारी सुमारे १ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. अपघाताच्या वेळी ऑटोमध्ये चालकाव्यतिरिक्त अन्य कोणीही प्रवासी नव्हता, अशी माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. ग्रामीण पोलिसांनी अपघातग्रस्त ऑटो ताब्यात घेतला असून फरार चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पीएसआय राहुल देशमुख आणि पोलीस कर्मचारी प्रेम आडे करीत आहेत.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुसद शहरातील इंदिरानगर डम्पिंग ग्राउंड परिसरात झालेल्या अपघातातही एका होमगार्ड जवानाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आणखी एका होमगार्ड जवानाचा अपघाती मृत्यू झाल्याने होमगार्ड दलासह पुसद शहरात शोककळा पसरली आहे.

ऑटोचालक आपल्या ताब्यातील वाहन नेहमीच भरधाव चालवित असल्यामुळे अपघाताच्या घटना ही नित्याची बाब झाली आहे. मधात ऑटो थांबविणे, वाटेल तेथून सवाऱ्या घेणे असे प्रकारही घडत आहेत. यावर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### शिंदेंचे ऑपरेशन टायगर 2.0!

# ठाकरेंचे 12 नगरसेवक गळाला; 5 कोटींचा निधी देण्याची चर्चा

प्रतिनिधी | १० जुलै



नाशिक : एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वीच ऑपरेशन टायगर राबवून ठाकरे गटाचे सहा खासदार आणि विधान परिषदेतील आमदार सचिन अहिर यांना गळाला लावले होते. या धक्क्यामुळे ठाकरेंच्या पक्षाला आणखी खिंडार पडून पक्ष खिळखिळा झाला आहे. या सगळ्याची चर्चा थांबत नाही तोच आता शिंदे गटाकडून नाशिकमध्ये ठाकरेंना मोठा धक्का देण्याच्या हालचाली सुरु आहेत. नाशिक महानगरपालिकेतील ठाकरे गटाचे अनेक नगरसेवक सध्या शिंदे सेनेच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, नाशिकमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेच्या १० ते १२ नगरसेवकांसाठी शिंदेंच्या शिवसेनेने गळ टाकला आहे. नाशिक महापालिकेच्या वर्तुळात सध्या मोठ्या राजकीय हालचाली सुरु आहेत. ठाकरे गटातील अनेक नगरसेवकांच्या शिंदे सेनेतील वरिष्ठ नेत्यांसोबत बैठका झाल्याची सूत्रांची माहिती आहे. ठाकरे गटाच्या या नगरसेवकांना प्रभागनिहाय ५ कोटी रुपयांच्या विशेष निधीचे आमिष दिल्याची चर्चा आहे. शिंदेंच्या शिवसेनेकडून संघटना विस्तारासाठी सुरु असलेल्या या हालचालींमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

### अनेक नेते शिवसेना प्रवेशासाठी इच्छुक : अजय बोरस्ते

» फक्त नाशिकच नव्हे, तर राज्यातील अनेक नेते शिवसेनेत प्रवेशासाठी इच्छुक असल्याचा दावा शिवसेना उपनेते अजय बोरस्ते यांनी केला आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषदेच्या वेळी मंत्री उदय सामंत, दादा भुसे, आमदार सुहास कांदे यांच्या संपर्कात अनेक पक्षाचे नगरसेवक होते, त्यातून कोणी प्रवेश करत असेल तर स्वागत आहे, हे ऑपरेशन नाही तर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे आकर्षण असल्याचा दावा अजय बोरस्ते यांनी केला आहे.

### मुंबई मनपात भाजपचा एक नगरसेवक वाढणार!

» मानखुर्द-शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील एआयएमआयएमच्या नगरसेविका रोशन इरफान शेख यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवण्यात आले आहे. त्यामुळे रोशन शेख यांचे नगरसेवकपद गेल्याने भाजपला तिसऱ्यांदा लॉटरी लागण्याची शक्यात निर्माण झाली असून भाजपचाच आणखी एक नगरसेवक वाढणार आहे. या प्रभागात दुसऱ्या क्रमांकावर असलेला भाजप उमेदवार आता नगरसेवक होण्याची शक्यता आहे.

# कर्जमाफी पुन्हा लांबणीवर!

प्रतिनिधी | १० जुलै

**मुंबई :** महायुती सरकारने घोषणा केलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेसंदर्भात अतिशय मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीची अंमलबजावणी पुन्हा लांबणीवर पडली आहे. केंद्र सरकारकडून डेटा आल्यावरच कर्जमाफीच्या निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली जाईल, असे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

सरकारने केंद्राकडे इन्कम टॅक्ससंदर्भात माहिती मागवली आहे. ही माहिती हाती येण्यास पाच ते सहा दिवस लागणार आहेत. त्यामुळे पुढील आठवड्यात तरी कर्जमाफीची अंमलबजावणी होणार का हा प्रश्नच आहे. तसेच आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी की नाही, याबाबतही महत्त्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे. तसा निर्णय झाला तर अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहतील. त्यामुळे सरकारला शेतकरी संघटनांच्या रोषाला पुन्हा एकदा सामोरे जावे लागणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेनुसार शेतकऱ्यांना दोन लाखांची कर्जमाफी आणि नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५० हजार रुपयांची सूट अशी घोषणा करण्यात आली होती. दोन दिवसांपूर्वी रविकांत तुपकर आणि इतर शेतकरी संघटनांनी आंदोलन केले होते. त्यामुळे राज्य सरकारवरील दबाव वाढला होता.

# गर्भवती टीसीएस कर्मचारी निदा खानला जामीन मंजूर

प्रतिनिधी | १० जुलै

**नाशिक:** नाशिक येथे धर्मांतर आणि लैंगिक छळ प्रकरणात आरोपी असलेल्या माजी टीसीएस कर्मचारी निदा खानला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने नमूद केले की, निदा पाच महिन्यांची गर्भवती असून तुरुंगात बाळाला जन्म देण्याचा मानसिक आघात कोणत्याही महिलेसाठी असह्य असतो. न्यायालयाने तुरुंगात झालेल्या भगवान कृष्णाच्या जन्माचाही दाखला दिला.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. जी. जोशी यांनी सांगितले की, नवजात बाळाचे भविष्य आणि आईची स्थिती लक्षात घेता आरोपीला जामीन देणे योग्य आहे. न्यायालयाने हे देखील मान्य केले की, या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे, त्यामुळे आरोपीला तुरुंगात ठेवण्याची गरज नाही.निदा खानला ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली होती. ती सुमारे २५ दिवसांपासून फरार होती. निदा खानवर एका सहकाऱ्यावर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी दबाव आणल्याचा आणि हिंदू देवतांचा अपमान केल्याचा आरोप आहे. नाशिकमधील एका बीपीओमधील २३ वर्षीय महिला कर्मचाऱ्याने तक्रार दाखल केल्यावर हा वाद सुरू झाला. तिने तिचा वरिष्ठ सहकारी दानिश शेख याच्यावर लैंगिक छळ केल्याचा आणि लग्नाची खोटी आश्वासने देऊन तिच्यासोबत प्रेमसंबंध ठेवल्याचा आरोप केला. तक्रारीत असेही म्हटले आहे की, दानिश शेख आणि त्याचा दुसरा सहकारी तौसीफ यांनी तिला इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी पटवण्याचा प्रयत्न केला.

# देवेंद्र फडणवीसांना अहंकाराची बाधा झाली:सपकाळ

## मिसिंग लिंकवरून टीकास्त्र, बुलडाण्यात प्रसारमाध्यमांशी साधला संवाद



प्रतिनिधी | १० जुलै

**बुलडाणा :** मिसिंग लिंकवरुन टीका झाल्यानंतर आणि 'ते इन्फ्राँमॅन नाही डिझास्टर मॅन आहेत' हे समोर आल्यामुळे देवेंद्र फडणवीस यांना इतका राग आला आणि त्यांनी सभागृहात विरोधकांवर आगपाखड केली. देवेंद्र फडणवीस सारखं सांगतात, मिसिंग लिंक मी बांधला. पण तुम्ही स्वतःची शेती, वाडा किंवा कुटुंबातील दागिने विकून मिसिंग लिंक बांधलेला नाही. एवढा मी पणा आणि अहंकार योग्य नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. ते शुक्रवारी बुलडाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांना अहंकाराची बाधा झाल्याचे म्हटले आहे.

मी मिसिंग लिंकबाबत टीका केल्यानंतर त्याला प्रत्युत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्याला काही समजत नाही, अक्कल नाही, त्याच्यावर काय बोलायचे. हादेखील देवेंद्र फडणवीस यांचा अहंकार आहे. मी त्यांच्या मान्यतेची कीव करतो. देवेंद्र फडणवीस ज्या विचारांच्या पठडीतून समोर आले आहेत, त्यांचा विचार आहे की, सगळं ज्ञान आमच्याकडे, आम्ही सोडून सगळे निर्बुद्ध आहेत. हाच हेका देवेंद्र फडणवीस यांच्या आरोपातून पुन्हा एकदा दिसून आला. मिसिंग लिंकवर दरड कोसळल्यानंतर राज्यभरातून देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका होत आहे. नागरिक रोष व्यक्त करत आहेत. विरोधक म्हणून आम्ही संवैधानिक टीका करत आहोत.

### समृद्धी महामार्गातील भ्रष्टाचार समोर येऊ द्या!

» देवेंद्र फडणवीस म्हणतात, एक कोटी खोटारडे मेल्यावर काही लोक जन्माला येतात. माझं देवेंद्र फडणवीस यांना आव्हान आहे की, आपल्या दोघांची नार्को टेस्ट करु. मिसिंग लिंक आणि समृद्धी महामार्गात किती भ्रष्टाचार झाला हे समोर येऊ द्या, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले.

### हे काही नळावरचे भांडण नाही!

» दहा वर्षांनी आम्ही असू पण विरोधक शिल्लक राहणार नाहीत, हे त्यांचे वक्तव्य त्यांच्या पक्षाची विचारसरणी दाखवणारे आहे, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात विरोधकांविषयी बोलताना 'थोबाड', 'कुत्रा' असे शब्द वापरले. ही भाषा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याला शोभत नाही. हे नळावरचे भांडण नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या तोंडी पानपट्टीवरील टपोरीची भाषा शोभत नाही, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले.




## स्वाधारच्या लाभासाठी वसतिगृहासाठी अर्ज आवश्यक

**अकोला :** वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळतो. त्यामुळे स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी वसतिगृहासाठी अर्ज केलेला असणे बंधनकारक असल्याचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मारुती वाठ यांनी स्पष्ट केले.शासकीय वसतिगृह सुविधेची जागेची मर्यादा लक्षात घेता सर्वच विद्यार्थ्यांना लाभ देणे शक्य होत नाही. पर्यायाने मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासुन वंचित राहतात. त्यामुळे मागावर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. हे लक्षात घेऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली. इयत्ता ११ वी १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे म्हणुन भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा केली जाते.

# अकोल्याच्या 'मास्टर पॉवर स्विमिंग क्लब'चा यवतमाळमधील झोनल स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये डंका

## 16 पदकांसह खेळाडूंची ऐतिहासिक कामगिरी

प्रतिनिधी १० जुलै

**अकोला :** यवतमाळला झालेल्या झोनल लेव्हल स्विमिंग चॅम्पियनशिप २०२६ मध्ये अकोला जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'मास्टर पॉवर स्विमिंग क्लब'च्या जलतरणपटूंनी उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर घवघवीत यश संपादन केले आहे. चुरशीच्या ठरलेल्या विभागीय स्पर्धेत अकोल्याच्या या गुणवान खेळाडूंनी १६ पदकांची कमाई करत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

१७ वर्षांखालील मुले रुद्र संजय पवार: याने ५० मीटर फ्री स्टाईल, १०० मीटर फ्री स्टाईल आणि ५० मीटर बटर स्ट्रोक या तिन्ही प्रकारांत सुवर्ण पदक पटकावले.

१४ वर्षांखालील मुले पार्थ राम राठोड याने २५ मीटर फ्री स्टाईलमध्ये सुवर्ण पदक, तर ५० मीटर फ्री स्टाईल आणि १०० मीटर फ्री स्टाईलमध्ये रजत पदक जिंकले. सक्षम राहुल इंगळे याने २५ मीटर व ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात सुवर्ण पदक आणि १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात रजत पदक पटकावले.

अनुज आशिष पनपालिया याने २५ मीटर बटरफ्लाय स्ट्रोक आणि ५० मीटर बटरफ्लाय स्ट्रोक अशा दोन्ही प्रकारांत सुवर्ण पदक जिंकले, तसेच २५ मीटर फ्री स्टाईलमध्ये रजत पदक जिंकले. १४ वर्षांखालील मुलीमधे लावण्या गणेश कटारे हिने २५ मीटर फ्री स्टाईलमध्ये सुवर्ण पदक, २५ मीटर बॅक स्ट्रोकचे रजत पदक आणि ५० मीटर फ्री स्टाईलमध्ये कांस्य पदक पटकावले.

१२ वर्षांखालील मुले प्रणव प्रशांत गवई या छोट्या जलतरणपटूने २०० मीटर फ्री स्टाईल स्विमिंगमध्ये सुवर्ण पदक पटकावले. कोच योगेश अनंत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



खेळाडूंच्या या दैदिप्यमान यशामागे मुख्य प्रशिक्षक एनआयएस (नॅशनल कोच) योगेश अनंत पाटील यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन आणि कडक प्रशिक्षण लाभले. योगेश पाटील यांनी प्रत्येक खेळाडूच्या कौशल्यावर लक्ष देऊन यश मिळवले. या ऐतिहासिक यशाबद्दल मास्टर पॉवर स्विमिंग क्लबचे सदस्य विशाल पोहेकर, प्रमोद खंडारे, सुशील कांबळे, मोहिल खरात, दिनेश वाघ, ज्योती पनपालिया, कविता जावरकर, मनीषा वंजारी, प्रथमेश डोईफोडे, आकाश यादव, गायत्री सरदार, पल्लवी शिंदे, आदित्य थोरात आणि रामकृष्ण रोहनकर, अमन इंगळे यांनी सर्व विजेत्या, कोच योगेश पाटील आणि पालकांचे कौतुक केले आहे.

## आषाढी एकादशीसाठी अकोला आगारातून 225 बसेसचे नियोजन

प्रतिनिधी १० जुलै

**अकोला :** २५ जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. आषाढी एकादशीनिमित्त हजारो भाविक विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे रवाना होतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांच्या सोयीसाठी अकोला आगारातर्फे विशेष पंढरपूर यात्रा बसची व्यवस्था करण्यात आली आहे. आषाढी एकादशीसाठी २२५ एसटी बसचे नियोजन करण्यात आले आहे.

श्री क्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक जात असतात. या भाविकांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने २० जुलै ते ३० जुलै २०२६ या कालावधीत विशेष पंढरपूर यात्रा बसची व्यवस्था करण्यात आली आहे. आषाढी एकादशीचा मुख्य यात्रा महोत्सव शनिवार, २५ जुलै रोजी असणार



आहे. सर्व भाविकांना विठू माऊलीचे दर्शन घेता यावे, यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून अकोला विभागातील ९ आगारांमधून आषाढी पंढरपूर यात्रेसाठी विशेष २२५ एसटी बसचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अकोला विभागीय कार्यालयातून प्राप्त झाली आहे.

भाविकांचा पहिला जत्था घेऊन २० जुलैपासून या यात्रा बस पंढरपूरच्या दिशेने रवाना होतील. तसेच, परतीच्या प्रवासासाठी आगारांमध्ये अतिरिक्त आरक्षणाची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

## नियम धाब्यावर ठेवून शाळेचे स्थलांतर?; रोषणपूरातील विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह

**मूर्तिजापूर :** शहरातील रोषणपूरा परिसरात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या नॅशनल उर्दू हायस्कूलच्या प्रस्तावित स्थलांतरावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. शाळेचे स्थलांतर शिक्षण विभागाच्या नियमांना बगल देऊन करण्यात येत असल्याचा आरोप करत स्थानिक नागरिक, पालक आणि अन्य शैक्षणिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र आक्षेप नोंदविला आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याबरोबरच परिसरातील शैक्षणिक समतोलही बिघडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

निवेदनानुसार, संबंधित शाळेच्या विद्यमान इमारतीत अपुऱ्या भौतिक सुविधा, पालकांच्या तक्रारी आणि विविध प्रशासकीय बाबी लक्षात घेऊन शिक्षण विभागाकडे शाळेची मान्यता रद्द करण्यासाठी पूर्वी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र, शाळेचे स्थलांतर करताना शासनाने निश्चित केलेल्या अंतराच्या निकषांचे पालन करावे अशी विनंती करण्यात आली आहे.

> नॅशनल उर्दू हायस्कूल या शाळेच्या स्थलांतरास मंजुरी देण्यापूर्वी आमच्या मदिना उर्दू प्राथमिक शाळा ,मदिना उर्दू हायस्कूल , गुलामनबी आझाद उर्दू गर्ल हायस्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येवर दूषपरिणाम होऊ नये या दृष्टीने नियमानुसार विहित अंतर मर्यादेच्या आत शिक्षण विभागाने स्थलांतर परवानगी देवू नये .अन्यथा नियमबाह्य पद्धतीने स्थलांतरास परवानगी दिल्यास न्यायालयात दाद मागण्यात येईल.
>
> मझहर अली नवाब, संस्था चालक ,मूर्तिजापूर

रहेमतनगर परिसरात यापूर्वीपासूनच मदिना उर्दू हायस्कूल,मदिना प्राथमिक उर्दू शाळा तसेच उर्दू कनिष्ठ महाविद्यालय कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत अवघ्या दिडशे मीटर अंतरावरच आणखी एका उर्दू माध्यमाच्या शाळेला स्थलांतरित करण्याचा प्रयत्न नियमबाह्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, नवीन ठिकाणी स्थलांतर झाल्यास विद्यमान शाळांमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण घटण्याची शक्यता असून, त्यामुळे वर्ग बंद होणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे. तसेच रोषणपूरा परिसरातील विद्यार्थ्यांना जवळची शाळा उपलब्ध नसल्याने त्यांना अधिक अंतराचा प्रवास करावा लागेल, अशीही चिंता व्यक्त करण्यात आली. नागरिकांच्या प्रमुख मागण्या शाळेचे स्थलांतर शासनाच्या नियमानुसारच करावे, विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन निर्णय घ्यावा, शिक्षण विभागाने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी,

नियमांचे पालन न झाल्यास न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## राष्ट्रीय ग्रामीण स्तरामधून जिल्ह्यातून नूतन विद्यालयाचे विद्यार्थी प्रथम

प्रतिनिधी १० जुलै

**आलेगाव :** येथील आदिवासी बहुल प्रदेशात असणाऱ्या आलेगाव मधील नूतन विद्यालय आलेगाव येथील वर्ग पाचवीच्या महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्ती परीक्षे मध्ये वर्ग पाचवीतील एकूण 25 विद्यार्थी शिष्यवृत्ती करिता उत्तीर्ण होऊन पात्र झालेली आहेत यामधून संपूर्ण अकोला जिल्ह्यामधून *राष्ट्रीय ग्रामीण स्तरावरील जिल्ह्यातून प्रथम येण्याचा बहुमान कुमारी आरुषी गणेश धारतारकर तसेच जिल्ह्यातून पाचव्या क्रमांकावर सार्थक सुधीर तायडे* यांनी नूतन विद्यालयाचे नाव संपूर्ण अकोला जिल्ह्याच्या पटलावर प्रथम क्रमांकावर नेले आहे

तसेच वर्ग आठवीतील 41 विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले आहे त्यामधून जिल्ह्यातून *राष्ट्रीय ग्रामीण स्तर अकोला जिल्हा मधून चतुर्थ क्रमांक कुमारी खुशी रमेश तायडे व तसेच पाचवा क्रमांक आदिती भीमराव ताजणे या विद्यार्थिनींनी मिळविला



आहे. या निकालामुळे शिष्यवृत्ती परीक्षेत मागील अनेक वर्षांपासून नूतन विद्यालय निरंतर यशाची नवीन नवीन शिखरे प्राप्त करीत आहे त्यामध्ये नूतन विद्यालय च्या या यशाचे श्रेय विद्यार्थी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व पालक यांना देत आहे. नूतन विद्यालयाचे अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्ती पात्र वर्ग पाचवी व आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांचे खूप अभिनंदन केले तसेच राष्ट्रीय ग्रामीण स्तरांमधून जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या व पाचव्या क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार सर्व संचालक मंडळाद्वारे घेण्यात आला. यशस्वीतेची परंपरा कायम केली आहे तसेच सर्व नागरिकांना या यशामुळे खूप आनंद झालेला आहे

## 17 जूनचे आरक्षण विरोधी पत्र रद्द करा

प्रतिनिधी १० जुलै

**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १७/०६/२०२६ अन्वये, "उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित संस्थांना/ महाविद्यालयांना महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती,( विमुक्त जाती ) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण ) अधिनियम २००१ मधील तरतुदी लागू होत नाहीत असे आरक्षण विरोधी पत्र काढले आहे. याचा सरळ अर्थ असा की, राज्यातील विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये आरक्षण लागू होणार नाही. या सर्व महाविद्यालयांनी आपल्या मनाप्रमाणे अर्थात कोणत्याही पद्धतीचे सामाजिक आरक्षण लागू न करता पदभरती करावी असे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र शासनाचे सदर पत्र सामाजिक न्याय,



### डाटाची मागणी

राज्यघटनेतील समानतेचे तत्त्व आणि आरक्षण धोरणाच्या संवैधानिक तरतुदींचे उल्लंघन करणारे आहे.

कंत्राटी पद्धती करिता सुद्धा आरक्षण असावे असा शासन निर्णय काढला. एवढेच नाही तर तासिका तत्त्वावरील शिक्षकांकरिता सुद्धा आरक्षण असावे असा शासन निर्णय काढला. मग शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १७ जून, २०२६ चे पत्र झोपेत काढले का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

डाटा या संघटनेने दिनांक ८/७/२०२६ रोजी शिष्टमंडळाद्वारे प्रत्यक्ष भेटून अमरावती विभागाच्या सहसंचालकांना निवेदन सादर केले. याप्रसंगी सहसंचालक उच्च शिक्षण विभाग अमरावती यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली. याशिवाय पंचफुला देवी समाज कार्य महाविद्यालय, अकोला येथून सेवानिवृत्त झालेले डॉ.संदीप भोवते यांच्या प्रलंबित निवृत्ती वेतन (पेन्शन) बाबत तसेच प्रा. प्रीती इंगळे यांच्या प्रकरणावर देखील चर्चा करून न्यायोचित कार्यवाही व्हावी अशी मागणी डाटाच्या वतीने करण्यात आली. याप्रसंगी उपाध्यक्ष डॉ.अशोक भोरजार, डॉ. एम. आर. इंगळे, डॉ. कल्याण साखरकर, कार्यकारिणी सदस्य डॉ.संजय खडसे, डॉ.रवी जुमळे, डॉ.संतोष बनसोड, अमरावती जिल्हाध्यक्ष डॉ.देवीलाल आठवले, डॉ.संदीप भोवते, प्रा. प्रभाकर बोरकर, डॉ. व्ही.आर.खोब्रागडे, अॅड. प्रज्ञा खोब्रागडे इत्यादी उपस्थित होते.

## पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत 14 जुलै पूर्वी सहभागी व्हावे



प्रतिनिधी १० जुलै

**अकोला :** पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना राज्यात मृग व आंबिया बहार मध्ये राबविण्यात येत आहे मृगबहार सन 2026-27 अंतर्गत संत्रा, मोसंबी लिंबू ,डाळिंब ,पेरू चिकू या पिकांसाठी योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत 14 जुलै असून सर्व शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न बघता फळ पिकांचे संरक्षण करून योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय कृषी विमा कंपनीने व कृषी विभाग यांच्या वतीने करण्यात आले.

तसेच योजनेमध्ये शेतकऱ्यांनी योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन भारतीय कृषी विमा कंपनीच्या वतीने करण्यात आले तसेच या योजनेअंतर्गत अकोला जिल्ह्यात ,संत्रा मोसंबी ,डाळिंब ,लिंबू

### कृषी विभाग व भारतीय कृषी विमा कंपनी यांचे आवाहन


,पेरू ,चिकू आणि हळद या पिकांचे या पिकांचा समावेश करण्यात आला आहे विशेष म्हणजे यावर्षी हळद या पिकाचा प्रथमच योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित पिकाची लागवड केलेल्या शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी पिक विमा काढून घ्यावा. मृग बहार सन 2026 -27 अंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होऊन आपल्या फळ पिकांचे संरक्षण करावे व विहित मुदतीपूर्वी अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा.

असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक सचिन पेवकर,तालुका व्यवस्थापक दीपक नवघरे, रुपाली पातोंड यांनी केले.

## स्व.डॅडी देशमुख यांच्या 21 व्या पुण्यतिथी निमित्त शालेय विद्यार्थ्यांकिरिता रंगभरो स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी १० जुलै

**अकोला :** माजी नगराध्यक्ष आणि थोर शिक्षणतज्ञ स्व. डॅडी देशमुख यांच्या 21 व्या पुण्यतिथी निमित्त बाबूजी देशमुख वाचनालय आणि ललित कला अकॅडमी अकोला तर्फे रविवार 12 जुलै रोजी सकाळी 9ते 10 या वेळे दरम्यान श्री शिवाजी महाविद्यालय, डॉ.बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय ,अकोला आणि जुने शहरातील विद्यार्थ्यांसाठी हरिहर पेठ येथील श्री शिवाजी विद्यालय शहर शाखा येथे वर्ग 5 ते 7 आणि8 ते 10 या दोन वयोगटात शालेय विद्यार्थ्यांकरिता रंगभरो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागीतेसाठी



इच्छुकांनी आपली नावे शाळेमार्फत दिनांक 10 जुलै 2026 पर्यंत बाबुजी देशमुख वाचनालय अकोला येथे सकाळी 8 ते 11 आणि सायंकाळी 4 ते8 या वेळेदरम्यान नोंदवावी.

स्पर्धेचे पारितोषिक समारंभ मंगळवार दिनांक 21 जुलै 2026 रोजी सायंकाळी ठीक 4 वाजता वसंत सभागृह श्री शिवाजी महाविद्यालय अकोला येथे संपन्न होणार आहे दोन्ही गटातील विजय स्पर्धकांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र तसेच उत्तेजनार्थ बक्षीस रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार आहे याप्रसंगी सर्व सहभागीताना प्रमाणपत्र सुद्धा वितरित करण्यात येणार आहे. तरी या स्पर्धेचा लाभ सर्व शालेय विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येत सहभाग नोंदवून घ्यावा असे आवाहन बाबुजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार आणि ललित कला अॅकॅडमीचे अध्यक्ष प्रा. सुरेश राऊत यांनी संयुक्त पत्रकाद्वारे केले आहे.

## स्टेट बँक शाखेच्या वतीने ग्राहकांच्या नातेवाईकाला 2 लाखाचे विम्याचे कवच

प्रतिनिधी १० जुलै

**हिवरखेड :** येथील स्थानिक एस बी आय शाखेच्या वतीने आकस्मिक निधन झालेल्या ग्राहकांच्या नातेवाईकाला ७ जुलै रोजी २ लाखाचे विम्याचे कवच देण्यात आले. हा विमा पंतप्रधान जीवन ज्योत योजने अंतर्गत देण्यात आला,

या शाखेचे ग्राहक स्व. सुरेश मनोहर बांगर यांनी यांचा वारसा यांचे भाऊ याच्या सहकार्याने स्टेट बँक मध्ये ४३६ रुपयांचा विमा काढला होता. काही कालावधी नंतर त्यांचा आकस्मिक मृत्यू झाला. त्यांचा वारसा असलेले त्यांचे भाऊ यांनी ही बाब त्यावेळी असलेले शाखा अधिकारी मनोज चव्हाण यांच्या निदर्शनात आणून दिली शाखा अधिकारी यांनी कागदांची पूर्तता करून पंतप्रधान जीवन ज्योत विम्या अंतर्गत विमा



कंपनीकडे पूर्तता केली, व दिनांक ७ जुलै रोजी मृतकाचा वारसा महेंद्र मनोहर बांगर यांना २ लाखाचे अर्थसाह्य देण्यात आले, यावेळी शाखेचे नवयुक्त अधिकारी राजकुमार कापगते, बँकेचे कर्मचारी, पत्रकार अर्जुन खिरोडकार व काही ग्राहक उपस्थित होते, ग्राहकांनी या विम्याचा लाभ घ्यावा.

हा विमा काढून वार्षिक फक्त ४३६ रुपये भरावे आपल्या वारसाला याचा लाभ मिळेल असे आव्हान स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा हिवरखेडच्या वतीने करण्यात आले.

### विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुविधा -जिल्हाधिकारी वर्षा मीना

**अकोला :** येथे केंद्रीय विद्यालय सुरू करण्यास केंद्रीय विद्यालय संघटनतर्फे मंजुरी व अधिसूचना जारी करण्यात आली आहे. त्यामुळे अकोल्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण सुविधा उपलब्ध होणार आहे. तेथील प्रवेशप्रक्रिया तत्काळ सुरू करण्यासाठी गतीने प्रक्रिया राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

केंद्रिय विद्यालयाच्या इमारत, प्रवेशप्रक्रिया आदी व्यवस्थेच्या अनुषंगाने बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत बैठक आज झाली, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार, साबांवि कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, विद्यालयाचे प्राचार्य बालाजी मारकवार आदी अधिकारी उपस्थित होते.

यंदा प्रवेशप्रक्रिया सुरू होण्यासाठी शाळेसाठी हरिहरपेठेतील जि. प. शाळेची जागा तात्पुरत्या स्वरूपात निश्चित करण्यात आली असून, तिथे लवकरच शाळा सुरू होणार आहे. शाळेची प्रवेशप्रक्रियाही लवकरच सुरू होईल. त्यादृष्टीने आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी.

### उमलत्या कळ्या

वाढदिवस



आरुषी धारतरकर
रा. आलेगाव



सार्थक तायडे
रा. आलेगाव

## शरद पवार यांच्या भेटीवरून वाद निर्माण करणे अयोग्य; संजय राऊत यांनी संयम बाळगावा – जावेद जकरिया

प्रतिनिधी ९ जुलै

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, राष्ट्रीय स्तरावरील ज्येष्ठ नेते शरद पवार हे कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याला भेटले, म्हणून त्यावरून अनावश्यक वाद निर्माण करणे योग्य नाही. लोकशाही व्यवस्थेत संवाद, शिष्टाचाराच्या भेटी आणि राजकीय चर्चा हा राजकारणाचा स्वाभाविक भाग आहे.

झकरिया म्हणाले की, शरद पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अलीकडील भेटीवर



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे नेते संजय राऊत यांनी केलेली प्रतिक्रिया योग्य नाही. कोणत्याही भेटीचे राजकीय अर्थ काढण्यापूर्वी सर्वांनी संयम बाळगणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात स्वतः संजय राऊत यांनी अनेक वेळा सार्वजनिक मंचावर "बाबरी मशीद आम्ही पाडली" अशी विधाने केली होती. अशा वक्तव्यांमुळे देशातील कोट्यवधी मुस्लिम बांधवांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या होत्या. तरीही मुस्लिम समाजाने तसेच महाविकास आघाडीच्या समर्थकांनी आघाडीची एकजूट आणि शरद पवार तसेच राहुल गांधी यांच्यावरील आदर कायम ठेवत संयमाची भूमिका घेतली.

जावेद झकरिया म्हणाले की, दररोज प्रत्येक विषयावर प्रतिक्रिया देणे आवश्यक नसते. राजकारणात बोलण्याइतकेच शांत राहणे आणि संयम राखणेही महत्त्वाचे असते. प्रत्येक विषयावर भाष्य करणे हीच परिपक्व राजकारणाची ओळख नसते.

## जांभरूण हनुमान मंदिर रस्ता त्रासदायक
# चिखलाचा रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

प्रतिनिधी १० जुलै

**आलेगाव :** पातूर तालुक्यातील जांबरुण येथील प्रसिद्ध हनुमान मंदिराकडे जाणारा रस्ता पावसामुळे, चिखलमय झाला असून भाविक भक्तांना चिखलातून चालत जावे लागत आहे.

पातूर तालुक्यातील बाभुळगाव गट ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या जांबरुण येथील हनुमानाचे मंदिर पंचक्रोशी मध्ये जागृत हनुमान मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे.या अनुषंगाने जिल्ह्यातील अनेक भाविक देवदर्शना करीता आणि कबूल केलेला नवस फेडण्यासाठी दर शनिवारी शेकडोंच्या संख्येने येत असतात.पर्यायाने वाहनांची मोठी रेलचेल असते.सदर मंदिर



हे वाहतूक रस्त्याच्या जवळपास २५ ते ३० मीटर अंतरावर आहे. आणि वाहनांची रेलचेल वाहतूक रस्त्यावर अथवा कडेला होऊन ईतर वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मंदिर परिसरामध्ये वाहने उभे करण्याची मोठी व्यवस्था केलेली आहे.

त्यामुळे ईतर वाहतुकीला सदर वाहनांचा आज पर्यंत अडथळा निर्माण झाला नाही.परंतु मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती ही काँक्रिट टाकून झाली नसल्यामुळे,सदर रस्ता कच्चा मातीचा असल्यामुळे पावसाच्या पाण्यामुळे चिखलमय झाला असून सदर रस्त्यावरून पायी चालत जाणे कठीण झाले असून भाविक भक्तांची वाहने चिखलातून जाणे शक्यच नाही.

त्यामुळे.सदर वाहनांची रेलचेल वाहतूक रस्त्याच्या कडेला होऊन इतर वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये व भाविक भक्तांना मंदिरामध्ये जाऊन मनोभावे पूजाअर्चा करता यावी या करीता बाभुळगाव ग्राम पंचायत प्रशासनाने सदर रस्त्याची दुरुस्ती तात्काळ करावी व भाविक भक्तांना न्याय मिळावा या अनुषंगाने पातूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश डहाळे यांनी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या सह बाभुळगाव ग्राम पंचायत सचिव सरपंच यांचे नावे निवेदनाद्वारे रस्ता दुरुस्तीची मागणी केली आहे.

### निधन वार्ता

**मधुकरराव आढे**



**अकोला :** खडकी येथील जि. प. कॉलनीतील रहिवासी मधुकरराव आढे गुरूजी यांचे ८ जुलैला निधन झाले. अ. भा. कुणबी समाज मंडळ अध्यक्ष राजूभाऊ आढे, अध्यक्ष, अखिल भारतीय कुणबी समाज मंडळ यांचे ते वडील होत.

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



## महापौर, सभापती यांच्या दाव्यांना



# खोटे कसे ठरविणार आमदार साजीद खान पठाण ?




प्रतिनिधी १० जुलै

अकोला : नुकत्याच एका प्रेस कॉन्फरन्समध्ये स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल आणि महापौर यांनी अकोला पश्चिम चे आमदार साजीद खान पठाण यांच्यावर पुराव्यानिशी गंभीर टिका केली. त्यात तथ्य देखील आहे. अकोल्यातील ज्या मुस्लिम वस्त्यांमध्ये विकास झाला नाही त्या ठिकाणी आमदार निधी का वापरला गेला नाही अशी विचारणा होत आहे.

अकोल्यातील झुडीओ या भव्य शो रुमच्या बाजुला असलेल्या रोडचे काम आमदार साजीद खान पठाण यांच्या विकास निधीतून झाले. तोच आरोप महापौर शारदा खेडकर व स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी लावला. शहरातील मुस्लिम बहुल भागात विकास कामे नाहीत. त्यासाठी त्या त्या प्रभागातील नगरसेवकांची ओरड असते. तशी वास्तविक परिस्थिती देखील आहे. मुस्लिम बहुल भागात विकास कामांना प्राधान्य न देता आमदार साजीद खान यांनी ४४ लाखांचा रस्ता येथे का बांधला हा वादाचा विषय नाही. वादाचा विषय ज्या भागात विकास कामांची गरज आहे त्या भागात मुरुम उपलब्ध नाही. रस्ते नाही. अशा ठिकाणी निधी खर्च करण्याची गरज जनतेची आहे. तशी मागणीच शहरातील मुस्लिम बहुल भागातून होत आहे. सिटी न्यूज सुपरफास्ट ने शहरातील काही मुस्लिम बहुल भागांचा दौरा केल्यावर ही विदारक परिस्थिती समोर आली आहे.

## मुस्लिम वस्त्यांमध्ये साध्या मुरमासाठी नागरिकांची मरमर







## भारत नगर, रफीक नगर परिसरात समस्यांचा डोंगर

शहरातील वार्ड क्रमांक १ मध्ये नागरी समस्यांचा अक्षरशः डोंगर दिसतो. खुल्या जागेत पाणी साचले आहे. त्यामुळे प्रार्थना स्थळात जायला रस्ता राहिला नाही. एका भागात सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तर दुसरीकडे कच्चा रस्ता. चिखल साचल्याने धड चालता देखील येत नाही. विकासाचा असमतोल कधी दूर होईल असा प्रश्न रहिवाशांना पडला आहे. वार्ड क्रमांक १ मधील भारत नगर आणि रफिक नगर परिसराकडे नजर टाकली तर पावसाळ्यात येथील लोक कसे राहत असतील असा प्रश्न पडतो.

रस्ते धड नसल्याने चालता येत नाही. मोकळ्या जागेत पाणी साचले आहे. जिकडे तिकडे अस्वच्छता दिसते. प्रार्थना स्थळाला जाण्यासाठी रस्ता नाही. इतकेच नव्हे तर विकासाच्या बाबतीत दुजाभाव दिसतो. एकीकडे पक्के रस्ते तर त्याच भागात रस्त्यांची पार धूळधाण झालेली. नागरी समस्यांनी या भागाला वेढा घातला आहे. महापालिका प्रशासन, स्थानिक नगरसेवक यांनी लक्ष घालून नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवाव्या अशी मागणी आहे.

# विद्यार्थी सुरक्षेला प्राधान्य; अकोल्यात शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा

प्रतिनिधी १० जुलै

**अकोला :** विद्यार्थ्यांना सुरक्षित, भयमुक्त आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अकोला व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थे तर्फे जिल्ह्यातील शिक्षकांसाठी "विद्यार्थी सुरक्षा व सुरक्षितता" विषयावरील विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



शाळांमध्ये विद्यार्थी सुरक्षेच्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, सुरक्षित वातावरणाची निर्मिती, जनजागृती आणि संभाव्य अनुचित घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर या कार्यशाळेत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान पोक्सो कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, चाईल्ड हेल्पलाईन 1098, शिक्षक व कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी, शाळांमधील सुरक्षा व्यवस्था, शालेय वाहतूक सुरक्षा, तसेच विद्यार्थी सुरक्षा समितीची स्थापना व जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यशाळेत ॲड. अनिता गुरव (अध्यक्ष, बालकल्याण समिती), प्रांजली जयस्वाल (सदस्य, बालकल्याण समिती) आणि चंद्रकला मेसरे (सहाय्यक पोलीस निरीक्षक, भरोसा व दामिनी पथक) यांनी विद्यार्थी संरक्षणासाठी आवश्यक कायदेशीर तरतुदी, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि शाळांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले.

## डॉक्टरांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ अकोल्यात काळ्या फिती लावून आंदोलन

**अकोला :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका रुग्णालयात कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर झालेल्या कथित हल्ल्याच्या निषेधार्थ अकोल्यात महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटना शाखेच्या वतीने गुरुवारी काळ्या फिती लावून मूक आंदोलन करण्यात आले. रुग्णसेवा अबाधित ठेवत सकाळी ९ वाजेपासून डॉक्टरांनी या घटनेचा निषेध नोंदविला.

या संदर्भात संघटनेचे अध्यक्ष डॉ. दिनेश नैताम आणि सचिव डॉ. विवेक कराळे यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना निवेदन सादर करून आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत प्रभावी उपाययोजना करण्याची मागण केली. संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, जुलै २०२६ रोजी केडीएमसी रुग्णालय कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर आ परिचारिकांवर एका राजकीय पक्षाच् नगरसेवकासह काहीजणांनी कथि मारहाण केल्याच्या घटनेमु राज्यभरातील वैद्यकीय क्षेत्रात संतापा लाट उसळली आहे. या पार्श्वभूमी आरोग्य सेवकांवरील वाढत्या हल्ल्यां निषेध करण्यासाठी आणि त्यांच् सुरक्षेचा प्रश्न अधोरेखित करण्यासाठी आंदोलन करण्यात आले.डॉक्टरांवरील हल्ल्याचे प्रमाण वाढणे ही चिंताजनक बाब आहे. या विरोधात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका यांनी अकोला शहरात संताप व्यक्त केला. संबंधितांविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली. तसेच अशा घटना पुन्हा घडणार नाही यासाठी कडक धोरण असावे असा मुद्दा रेटून धरला.

# गोमांस विक्री प्रकरणी एकास अटक अकोट शहर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १० जुलै

**अकोट :** शहर पोलिसांनी गोवंश मांस विक्रीसाठी ठेवणाऱ्या एका आरोपीला अटक करून सुमारे १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. एका आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी शहर पोलिस स्टेशन हद्दीत गस्त घालत असताना गाझी प्लॉट परिसरात छापा टाकला. यावेळी आरोपी अब्दुल वाहीद अब्दुल शकील रा. कांगारपुरा याच्या ताब्यातून गोवंशाचे ५० किलो मांस आढळले. कारवाई दरम्यान पोलिसांनी अंदाजे १२ हजार रुपये किमतीचे मांस, एक वजनकाटा, एक किलोचे वजन तसेच मांस कापण्यासाठी वापरण्यात येणारी लोखंडी सुरी असा १३ हजार रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त केला.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. अकोट शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत उपनिरीक्षक निलेश बारहाते, नरेंद्र जाधव, सुबोध, रामेश्वर भगत, कपिल राठोड व नितेश सोळंके यांनी सहभाग घेतला.

## हातरूण येथे वरलीच्या अड्डयावर पोलिसांची धाड

**हातरूण :** उरळ पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या हातरूण येथे पोलिसांनी वरली अड्डयावर धाड टाकून एकास अटक केली आहे.

पोलीस निरीक्षक जनार्धन खंडेराव यांच्या मार्गदर्शनात पोलीस हे का विजय चव्हाण, पो हे का रघुनाथ नेमाडे हे गस्तीवर असतांना त्यांना हातरूण येथे अवैध वरली मटका सुरु असल्याची माहिती मिळाली.

गुप्त माहितीच्या आधारे हातरूण येथील शाहीन शाह नगर मध्ये धाड टाकून अवैध वरली मटक्या च्या चिठ्या लिहीत असतांना शे शहबुद्दीन शे मोईनोद्दीन रा. पारस याला अटक केली. यावेळी त्याच्या जवळून 1660/- रुपये नगदी व वरली मटक्या च्या तीन पट्ट्या असा मुद्देमाल

# परभणीतील सोयाबीन उत्पादकांचे 40 कोटींचे नुकसान

## आमदार पिंपळे यांची कारवाईची मागणी

प्रतिनिधी १० जुलै

मुर्तिजापूर : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार हरीश पिंपळे यांनी परभणी जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा गंभीर प्रश्न सभागृहात उपस्थित केला. अतिवृष्टीमुळे ओल्या व वाळलेल्या सोयाबीनच्या वजनातील फरकामुळे शेतकऱ्यांचे सुमारे ४० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा मुद्दा त्यांनी मांडला.

यावेळी त्यांनी आरोप केला की, जिल्हा कृषी अधीक्षकांनी नुकसानीचे पंचनामे विमा कंपनीकडे सादर न केल्यामुळे शेतकरी विमा भरपाईपासून वंचित राहिले आहेत. अधिकारी आणि विमा कंपन्यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आमदार पिंपळे यांनी सरकारकडे पंचनामे लपविणाऱ्या संबंधित कृषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच



कोणताही विलंब न करता एका महिन्याच्या आत शेतकऱ्यांना ४० कोटी रुपयांची भरपाई देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

याशिवाय, भविष्यात बोगस पंचनाम्यांना आळा घालण्यासाठी 'जिओ ट्रॅकिंग' प्रणाली लागू करण्याची सूचना त्यांनी केली. या प्रणालीमध्ये तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक आणि संबंधित शेतकरी यांची ऑनलाइन उपस्थिती अनिवार्य करण्याची मागणीही त्यांनी केली.

"बळीराजाच्या घामाचा एकही पैसा कुणालाही खाऊ देणार नाही," असा निर्धार व्यक्त करत शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा सुरूच राहील, असे आमदार हरीश पिंपळे यांनी स्पष्ट केले.

# धर्मांतरानंतर पूर्वीच्या जातीच्या आरक्षणाचा लाभ घेता येत नाही!

## एआयएमआयएमच्या नगरसेविकेचा जातवैधता दावा फेटाळला

प्रतिनिधी १० जुलै

**अकोला :** अकोला महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक २-अ मधून एआयएमआयएम पक्षाच्या चिन्हावर नगरसेवकपदी निवडून आलेल्या सीमा अंजूम शेख अनिस यांचा जातवैधता प्रमाणपत्राचा दावा जिल्हास्तरीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने ६ जुलै २०२६ रोजी फेटाळला आहे. धर्मांतर केलेल्या व्यक्तीला धर्मातरापूर्वीच्या जातीसाठी उपलब्ध असलेले आरक्षण व त्याचे घटनात्मक लाभ घेता येत नाहीत, या सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा आधार घेत समितीने दिलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.



महापालिका निवडणूक लढण्यासाठी सीमा अंजूम शेख अनिस यांनी जात वैधता प्रस्ताव समितीकडे सादर केला होता. त्यावर अकोट फैलातील गजानन शिंदे यांनी हरकत घेतली होती. जात वैधता प्रमाणपत्रासाठी सीमा अंजूम शेख अनिस यांनी विवाहापूर्वीचे लक्ष्मी बंडू टेकाडे या नावाने घेतलेले महार जातीचे प्रमाणपत्र व त्या सोबतचे पुरावे दाखल केले.

अकोला उपविभागीय अधिकारी यांनी ३० जुलै २००८ रोजी दिलेले जात प्रमाणपत्र, शाळांमध्ये असलेल्या नोंदी व त्यांच्या बहिणीचे कागदपत्रही जोडले.

> जात प्रमाणपत्रांची अतिशय काटेकोरपणे पडताळणी करण्यात येत आहे. त्यामध्ये त्रुटी आढळली तर सदस्यांना सदस्यत्व गमवावे लागत आहे. त्यामुळे प्रमाणपत्र सादर करताना दक्षता घेणे तसेच चुकीची माहिती दिली जाणार नाही. या बाबतीत काटेकोरपणा महत्त्वाचा आहे.

विवाहानंतर त्यांचे नाव, संबंधित कागदपत्रे व त्यावरील नोंदी, रीतीरिवाजात मोठी तफावत आढळून आली. त्या सर्व बाबींचा आधार घेत हा निर्णय देण्यात आला. समितीने नमूद केले की, एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने धर्मांतर स्वीकारल्यानंतर त्या व्यक्तीचे धर्मांतरापूर्वीच्या सामाजिक प्रवर्गाशी असलेले कायदेशीर नाते संपुष्टात येते. त्यामुळे त्या जातीसाठी राखीव असलेल्या जागेवर निवडणूक लढविणे अथवा आरक्षणाचे लाभ घेण्याचा अधिकार राहत नाही.

निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालय व विविध उच्च न्यायालयांनी दिलेल्या निकालांचा संदर्भ देत, धर्मांतरानंतर पूर्वीच्या जातीच्या आधारे आरक्षणाचा दावा ग्राह्य धरता येत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सीमा अंजूम शेख अनिस यांचा जात वैधतेचा दावा ग्राह्य धरता येत येत नसल्याचे समितीने नमूद केले.

त्यामुळे त्यांचा जात वैधतेचा दावा फेटाळण्यात आला. तसेच जातीचे प्रमाणपत्र जप्त करून उपविभागीय अधिका-यांनी पुढील कारवाई करावी असा आदेश समिती अध्यक्ष अमोल यावलीकर, सचिव मनोज मारत यांनी दिला. या प्रकरणी अर्जदार सीमा अंजूम यांची बाजू ॲड. संतोष रहाटे, ॲड. खान यांनी तर तक्रारकर्त्यांची बाजू ॲड. एस. डी. उपरवट यांनी मांडली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# नाशिकपर्यंत पाठलाग : चार अल्पवयीन मुलींची सुटका

## सायबर तंत्रज्ञानाची मदत : आर्णी पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १० जुलै

**यवतमाळ** : अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेण्याच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर आर्णी पोलिसांनी राबविलेल्या विशेष शोध मोहिमेत चार वेगवेगळ्या प्रकरणांतील अल्पवयीन मुलींचा शोध घेण्यात यश मिळाले. सायबर तंत्रज्ञान, तांत्रिक विश्लेषण आणि विविध जिल्ह्यांत राबविलेल्या शोध मोहिमेच्या आधारे मुलींना सुखरूप ताब्यात घेऊन त्यांच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

जिल्ह्यात अल्पवयीन मुली घरातून निघून जाणे किंवा लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या निर्देशानुसार आर्णी पोलीस ठाण्यात विशेष शोध पथकाची स्थापना करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक रवींद्र जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने प्रलंबित गुन्ह्यांचा तपास वेगाने सुरू केला.

या मोहिमेदरम्यान गुन्हा क्रमांक 881/25 मधील पीडित मुलगी व आरोपीचा आदिलाबाद जिल्ह्यातील सावापूर येथून शोध घेण्यात आला. गुन्हा क्रमांक 464/26 मधील पीडित मुलगी जोडमोहा येथील उमरी दवाखाना परिसरातून, तर गुन्हा क्रमांक 219/26 मधील पीडित मुलगी औरंगाबाद येथून ताब्यात घेण्यात आली.

दरम्यान, 2 जुलै 2026 रोजी दाखल झालेल्या गुन्हा क्रमांक 577/26 मधील अल्पवयीन बालिकेचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नायगाव, कळंब, यवतमाळ, पहूर, पांगरी आणि मसाला परिसरात शोधमोहीम राबविली.

मात्र यश न आल्याने सायबर सेलच्या मदतीने कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर)चे विश्लेषण करण्यात आले. त्यातून संबंधित बालिका नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील वावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खोपडी येथे असल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर पोलीस अधीक्षकांच्या परवानगीनंतर ठाणेदार संजय खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नाशिकला रवाना झाले. खोपडी, पाथर्डी आणि सिन्नर परिसरात शोध घेऊन अखेर पीडित बालिकेचा शोध लावण्यात आला. तिला सुखरूप आर्णी येथे आणून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस उपनिरीक्षक रवींद्र जाधव, पोलीस जमादार सतीश चौधार आणि पोलीस अंमलदार राम ढाकणे यांनी अथक परिश्रम घेऊन यशस्वी केली. या धडाकेबाज कारवाईबद्दल आर्णी पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# शिक्षकांचे शाळाबंद आंदोलन

## 'दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्यासाठी सज्ज व्हा' : प्रशांत वंजारे





प्रतिनिधी १० जुलै

**यवतमाळ** : शिक्षकांना अशैक्षणिक कामांमधून मुक्त करणे, टीईटी परीक्षेतील सक्ती रद्द करणे, मतदार यादी पुनर्निरीक्षणाचे काम स्वतंत्र यंत्रणेकडे देणे तसेच शिक्षकांवरील वाढता प्रशासकीय ताण कमी करण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवारी शिक्षक समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली जिल्हाभर सामूहिक रजा व शाळाबंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विविध शिक्षक संघटनांतील हजारो शिक्षकांनी स्वेच्छेने सहभाग नोंदविला.

आंदोलनाला संबोधित करताना शिक्षक नेते प्रशांत वंजारे यांनी शिक्षकांनी दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. देशातील लोकशाही व्यवस्था आणि संवैधानिक संस्थांसमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली असून, अशा परिस्थितीत समाजाला योग्य दिशा देण्याची जबाबदारी शिक्षकांवर असल्याचे त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्य चळवळीत शिक्षकांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून देत, आजही लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी शिक्षकांनी संघटितपणे संघर्ष करण्याची वेळ आल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेत शिक्षकांना सातत्याने अशैक्षणिक कामे, ऑनलाइन-ऑफलाइन माहिती संकलन, निवडणूक प्रक्रियेतील विविध जबाबदाऱ्या यामुळे अध्यापनावर परिणाम होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शिक्षकांचा सन्मान राखत त्यांना केवळ शैक्षणिक कार्यासाठीच जबाबदारी द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ (शिवाजीराव पाटील प्रणित), अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ, आंबेडकरी शिक्षक संघम, आयडियल बहुजन टीचर असोसिएशन, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक संघ, एकल शिक्षक सेवा मंच, प्रहार शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना तसेच महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना आदी संघटनांनी सहभाग घेतला.

आंदोलनस्थळी विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या मागण्यांवर भूमिका मांडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल फुंडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आंदोलनाचे निमंत्रक संजय काळे यांनी मानले.

# स्मार्ट मीटर हटवून जुने मीटर बसवा

## वाढीव वीजबिलांविरोधात शिवसेनेचे निवेदन

प्रतिनिधी १० जुलै



**आर्णी** : स्मार्ट मीटरमुळे वापरापेक्षा अधिक वीजबिले येत असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गुरुवारी आर्णी तहसील कार्यालयावर निवेदन देत स्मार्ट मीटर हटवून पुन्हा जुने मीटर बसविण्याची मागणी केली.

शिवसेनेच्या निवेदनात आर्णी तालुक्यातील अनेक वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्यात आल्यानंतर अवाजवी वीजबिले येत असल्याने नागरिक आर्थिक अडचणीत सापडल्याचे म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्मार्ट मीटर बसविणे बंधनकारक नसल्याचे स्पष्ट केले असून, इच्छुक ग्राहकांनाच ते बसविण्यात यावेत, असा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे.

ज्या ग्राहकांना वाढीव वीजबिले आली आहेत, त्यांची तक्रार तत्काळ निकाली काढून बिलांमध्ये दुरुस्ती करावी तसेच संबंधित ग्राहकांच्या मागणीनुसार स्मार्ट मीटर काढून पारंपरिक मीटर बसविण्याची प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही करण्यात आली.

आर्णीचे तहसीलदार वैशाख वाहूरवाघ यांना हे निवेदन देण्यात आले. यावेळी अश्विन जाधव, जाकिर सोलंकी, विनय राठोड, अभिलाष इंगोले, संतोष राठोड, इमरान खान, सूरज राठोड, अलसिंग पवार, अंबादास शिंदे, राहुल पवार, विशाल राठोड, सावन चव्हाण, निलेश जाधव, पंडित काळे, गोपाल जाधव, बादल जाधव यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चिलवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

प्रतिनिधी १० जुलै

**पुसद** : सहकार सप्ताहानिमित्त संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था, पुसद यांच्या वतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिलवाडी येथील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये लेटर बुक, पेन, पेन्सिल, रबर, शार्पनर तसेच बिस्किटांचे पुडे देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे संस्थापक व अध्यक्ष आत्माराम जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून पतसंस्थेचे संचालक तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक गंगाराम काळे आणि ग्रामपंचायत सदस्य किसनराव काळे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका साळवण तसेच शिक्षिका पठारे आणि यादव यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

यावेळी गंगाराम काळे यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत, या शाळेतच प्राथमिक शिक्षण घेतल्याचे सांगितले. पूर्वी झाडाखाली आणि काही काळ गुरांच्या गोठ्यात भरत असलेली शाळा आज आधुनिक स्वरूपात पाहून समाधान वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साळवण यांनी केले, तर आभार प्रदर्शन यादव यांनी केले. शैक्षणिक साहित्याचे संच मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद हा कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरला. या उपक्रमाचे चिलवाडी ग्रामस्थांसह विविध स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

# थेरडी प्राथमिक आरोग्य केंद्र 'व्हेंटिलेटर'वर

## कर्मचारी गैरहजर, रुग्णवाहिका धूळखात

प्रतिनिधी १० जुलै



**उमरखेड** : तालुक्यातील दुर्गम बंदी भागातील थेरडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली असून, येथील आरोग्य व्यवस्था अक्षरशः कोलमडल्याचे चित्र आहे. वैद्यकीय अधिकारीसह १२ ते १५ कर्मचारी नियुक्त असतानाही बहुतांश कर्मचारी मुख्यालयात राहत नसल्याचा आरोप होत आहे. परिणामी, गरीब व ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर शासकीय आरोग्य सेवा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

आरोग्य केंद्रातील प्रसूतीगृह अनेक दिवसांपासून बंद असल्याने गरोदर महिलांना प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत आहे. दुर्गम भागातील खराब रस्त्यांमुळे माता व नवजात बालकांच्या जीवितालाही धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रसूतीगृहात सर्वत्र धूळ, कोळीष्टके व अस्वच्छता दिसून येत असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.


शासनाने उपलब्ध करून दिलेली लाखो रुपयांची रुग्णवाहिका आरोग्य केंद्राच्या आवारात धूळ खात पडून असल्याचेही निदर्शनास आले. आपत्कालीन परिस्थितीत सरकारी रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने रुग्णांना खासगी वाहनांसाठी हजारो रुपये खर्च करावे लागत आहेत.

सध्या पावसाळ्यामुळे साथीच्या आजारांचा धोका वाढला असताना अशा परिस्थितीत आरोग्य यंत्रणेची निष्क्रियता चिंतेची बाब ठरत आहे. थेरडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कारभाराची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, तसेच दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# सराईत गुन्हेगाराला तलवारींसह बेड्या

## कारसह साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त : गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी १० जुलै



**यवतमाळ** : घाटंजी शहरात घातक शस्त्रे बाळगून फिरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने गुरुवारी रात्री सापळा रचून अटक केली. त्याच्या ताब्यातून दोन तलवारी आणि गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार जप्त करण्यात आली आहे. अनिल उत्तम जाधव (वय २९, रा. इंदिरा नगर बेघर वस्ती, घाटंजी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण ४ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पो लीस निरीक्षक दत्ता पेंडकर व त्यांचे पथक पांढरकवडा उपविभागात अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी व फरार आरोपींच्या शोधार्थ गस्त घालत होते. याच दरम्यान घाटंजी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक सराईत गुन्हेगार घातक शस्त्रांसह कारमध्ये बसून असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. घाटंजी येथील पाटी बेघर परिसरातील रहिवासी असलेला अनिल जाधव हा खापरी नाका ते वेळाबारा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयास्पदरित्या थांबला असून, त्याच्याकडे धारदार तलवारी असल्याची पक्की माहिती खबऱ्यांकडून मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी दोन पंचांना पाचारण करून खापरी नाक्यापासून काही अंतरावर दबा धरला.

काही वेळातच पोलिसांना संशयित पांढऱ्या रंगाची कार दिसून आली. पोलिसांनी तातडीने व्यूहरचना करत कारला चारही बाजूंनी वेढा घातला आणि ड्रायव्हर सीटवर बसलेल्या अनिल जाधवला खाली उतरवून त्याची कसून चौकशी केली. कारच्या डिक्कीची तपासणी केली असता, त्यात एका निळ्या रंगाच्या प्लास्टिक पोत्यात लपवून ठेवलेल्या दोन धारदार लोखंडी तलवारी आढळून आल्या. या तलवारींचा वापर एखाद्या गंभीर गुन्ह्यासाठी केला जाणार असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. आरोपीविरुद्ध घाटंजी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये (Arms Act) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर यशस्वी कारवाई यवतमाळचे माननीय पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व पोलीस निरीक्षक सतीश चवरे (स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या धडक मोहिमेत सहाय्यक पो ली स निरीक्षक दत्ता पेंडकर, पो लीस हवालदार सुनील खंडागळे, सुधीर पांडे, सुधीर पिठुस्कर, पोलीस शिपाई रजनीकांत मडावी आणि चालक पोलीस हवालदार नरेश राऊत या स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व अंमलदारांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

# जबरी चोरीसह आठ गुन्ह्यांचा छडा

प्रतिनिधी १० जुलै



**पुसद** : पुसद शहर आणि वसंतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जबरी चोरीचे दोन तसेच शेतांमधील मोटार पंप व केबल चोरीचे सहा असे एकूण आठ गुन्हे स्थानिक गुन्हे शाखेने उघडकीस आणले आहेत. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्या अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींकडून सुमारे १ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

७ जुलै रोजी पुसद बसस्थानक परिसरात अरविंद चव्हाण यांच्याकडील मोबाईल आणि ३७ हजारांची रोकड हिसकावून नेण्यात आली होती. त्याच दिवशी वसंतनगर हद्दीत करण राठोड यांना स्वस्तात पुण्याला पाठविण्याचे आमिष दाखवून निर्जनस्थळी नेऊन ५ हजारांची रोकड आणि दोन चांदीच्या अंगठ्या लुटण्यात आल्या होत्या. या दोन्ही प्रकरणांचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता.

## एक अटक, विधिसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अयाज अहमद एजाज अहमद (रा. मधुकर नगर, पुसद) याला बरखा टॉकीज परिसरातून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने जबरी चोरीचे दोन्ही गुन्हे कबूल केले. त्याच्याकडून मोबाईल, १५ हजार २०० रुपयांची रोकड, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले.

चौकशीदरम्यान आरोपीकडून ८.५ किलो कॉपर वायरही जप्त करण्यात आली. त्यावरून पुसद ग्रामीण, खंडाळा, वसंतनगर आणि महागाव परिसरातील शेतांमधून मोटार पंप व केबल चोरीचे आणखी सहा गुन्हे उघडकीस आले. अशा प्रकारे जबरी चोरीचे दोन आणि शेतीसंबंधित चोरीचे सहा असे एकूण आठ गुन्हे उघड झाले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन करेवाड करीत आहेत.

# भूकंपानंतर अफवांना बळी पडू नका : जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

प्रतिनिधी १० जुलै

**उमरखेड** : हिंगोली जिल्ह्यात गुरुवारी पहाटे झालेल्या भूकंपानंतर नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि केवळ प्रशासनाच्या अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या प्राथमिक माहितीनुसार, पहाटे झालेल्या भूकंपाची तीव्रता ४.६ रिश्टर स्केल इतकी नोंदविण्यात आली असून, त्याचा केंद्रबिंदू वसमत तालुका परिसरात असल्याचे समोर आले आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याची माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.

जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सांगितले की, भूकंपासंदर्भातील अप्रमाणित संदेश किंवा समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये. अधिकृत माहिती जिल्हा प्रशासन, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि शासनाच्या अधिकृत माध्यमांतूनच घ्यावी. नागरिकांनी शांतता आणि संयम राखून प्रशासनाला सहकार्य करावे. कोणत्याही ठिकाणी नुकसान किंवा आपत्कालीन परिस्थिती आढळल्यास तातडीने स्थानिक प्रशासन अथवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

याशिवाय, समाजात भीतीचे वातावरण निर्माण होईल अशा अफवा किंवा दिशाभूल करणारे संदेश समाजमाध्यमांवर प्रसारित अथवा पुढे पाठविणे टाळावे, असेही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी स्पष्ट केले.

# शिवसेना उबाठाच्यावतीने रामरक्षा पठण व महाआरती

प्रतिनिधी १० जुलै



**उमरखेड** : अयोध्येतील राम मंदिरातील दानपेटी चोरीप्रकरणी शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने मंदिरातील दानपेट्यांचे चोरांपासून संरक्षण व्हावे यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार दि. ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शिवसैनिकांनी शहरातील हनुमान मंदिरासमोर महाआरती तसेच हनुमान चालीसा व रामरक्षा पठण केले. अयोध्येतील राम मंदिरातील दानपेटी चोरीच्या घटनेचा निषेध व्यक्त करून

प्रभू श्रीरामाचे चोरांच्या विरोधात घोषणाबाजी केली.

तसेच संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. याप्रसंगी हिंगोली जिल्हा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यक्रमात उबाठा पक्षाचे जिल्हा सह संपर्कप्रमुख ॲड. बळीराम मुटकुळे, विधानसभा समन्वयक राजेश खामनेकर, शहर प्रमुख संदिप ठाकरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेश कवाने,

तालुका प्रमुख सतिश नाईक, उपतालुका प्रमुख निलेश जैन, साहेबराव शिंदे, नागेश गोरेवाड, विजय हनवते, अनुसूचित जाती तालुकाप्रमुख अनिल कांबळे, जिल्हा समन्वयक संजय पळसकर, संतोष जाधव, छोटू शर्मा, राजेश पवार, सतिश कुबडे, सुरेश कल्याणकर, अनुराग मेने, सुमित नाईकवाडे, अनंत गौळकर, चंद्रकांत शहा, सुधीर कवाने, विजय शिंदे, संतोष व्यवहारे, यादव बचने, गजानन देशमुख आदिंनी सहभाग घेतला होता.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

५

शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# बडनेरा येथील जुनिवस्ती जुना बायपास उड्डाणपुलाची केली पाहणी

## आ.रवि राणा यांचे निर्देश; YSP मार्गदर्शक सुनिल राणा यांच्यासह अधिकाऱ्यांचा समावेश

प्रतिनिधी १० जुलै



**अमरावती :** भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांच्या कारकिर्दित विशेष प्रयत्नाने मंजुर व नवनीत राणा यांच्याहस्ते भुमीपुजन झालेले जुनिवस्ती जुना बायपास येथील 54 कोटी रुपयांच्या पुर्णत्वास गेलेल्या रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण

12 जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसुल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार ऑनलाइन लोकार्पण

सा.बा.वि चे उप अभियंता तुषार काळे,ए.डी.एन.राणे, वासेकर, महारेलचे कंत्राटदार हुसैन, श्रीरंग तायडे, महाजन साहेब, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, नगरसेविका मिरा कांबळे, मिनी महापौर किशोर जाधव, अजय जयस्वाल, गौरी मेघवानी, रजनी डोंगरे याची उपस्थिती होती.

बडनेरा शहराच्या वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा देणारा जुनिवस्ती जुना बायपास येथील सुमारे 54 कोटी रुपये खर्चाचा रेल्वे उड्डाणपूल व अंडरपास प्रकल्प पूर्णत्वास आला असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे 12 जुलै 2026 रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसेच महसुल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते ऑनलाइन लोकार्पण होणार आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार रवि राणा यांच्या निर्देशानुसार युवक स्वाभिमान पक्षाचे मार्गदर्शक सुनील राणा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व संबधीत विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून सुरू असलेल्या अंतिम तयारीचा आढावा घेतला. यावेळी लोकार्पण कार्यक्रमापूर्वी पूर्ण करावयाच्या कामांबाबत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

सदर रेल्वे उड्डाणपूल व अंडरपास हा प्रकल्प भाजपा नेत्या माजी खासदार सौ. नवनीत राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मंजूर व नवनीत राणा यांच्याहस्ते भुमीपुजन झालेले होते. अनेक वर्षांपासून जुनिवस्ती परिसरातील नागरिकांना रेल्वे फाटक बंद असल्यामुळे वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय आणि अपघाताचा धोका यांचा सामना करावा लागत होता. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून उड्डाणपूल व अंडरपासची उभारणी करण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे बडनेरा शहरातील जुनिवस्ती, जुना बायपास तसेच परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, वाहतूक अधिक सुरक्षित, जलद आणि सुरळीत होणार आहे. तसेच आपत्कालीन सेवा, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे.

यावेळी सा.बा.वि चे उप अभियंता तुषार काळे,ए.डी.एन. राणे, वासेकर, महारेलचे कंत्राटदार हुसैन, श्रीरंग तायडे, महाजन, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, मिनी महापौर किशोर जाधव, नगरसेविका मिरा कांबळे, नगरसेवक अजय जयस्वाल, नगरसेविका गौरी मेघवानी, रजनी डोंगरे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# युवा पार्टीचे आंदोलन

## शेतकऱ्यांना दिले बोगस बियाणे, युवा स्वाभिमान पक्षाचा आरोप

प्रतिनिधी १० जुलै



**अमरावती :** युवा स्वाभिमान पार्टीचे वतीने आंदोलन करण्यात आले. संबंधित कंपनीने शेतकऱ्यांना बोगस बियाणे दिले. असा आरोप युवा स्वाभिमान पक्षाचा वतीने करण्यात आला.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विभाग, अमरावती. यांना निवेदन देण्यात आले. अमरावती जिल्ह्यात शेतकऱ्यांची बोगस/ निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे झालेली आर्थिकहानी झाली आहे.

संबंधित बियाणे कंपन्यांची तातडीने चौकशी करून नुकसानभरपाई व योग्य ती कारवाई करण्याबाबत मागणी सुनील राणा यांनी केली आहे.

आमदार रवी राणा अध्यक्ष युवा स्वाभिमान पक्षाचे वतीने सविनय निवेदन असे की, अमरावती जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी विविध कंपन्यांचे सोयाबीन बियाणे सुमारे ₹१४० प्रति किलो या दराने खरेदी करून चालू हंगामात पेरणी केली. मात्र पेरणीनंतर मोठ्या प्रमाणावर बियाण्यांची उगवण झाली नाही अथवा अत्यल्प प्रमाणात उगवण झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. बियाणे खरेदीचा खर्च, पेरणीसाठी केलेला मजुरीचा खर्च, मशागत, वेळ, श्रम तसेच इतर कृषी खर्च पूर्णपणे वाया गेले आहेत. परिणामी शेतकरी अत्यंत चिंताग्रस्त व आर्थिक संकटात सापडले आहेत. आता पुनर्पेरणी करावी लागल्यास आवश्यक बियाणे उपलब्ध होईल की नाही, याबाबतही शेतकऱ्यांमध्ये मोठी अनिश्चितता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी आर्थिक संकट ओढवले आहे. तरी आपण या गंभीर बाबीची तात्काळ दखल घेऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, ही नम्र विनंती आहे.

मागण्या : , अमरावती जिल्ह्यात विक्री झालेल्या संबंधित सोयाबीन बियाण्यांची तात्काळ चौकशी करण्यात यावी, संबंधित बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवून त्यांच्या दर्जाची खात्री करण्यात यावी, दोषी आढळणाऱ्या बियाणे उत्पादक व विक्रेता कंपन्यांवर बियाणे अधिनियम व संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात यावी, बाधित शेतकऱ्यांचे पंचनामे करून त्यांना बियाण्याचा खर्च, पेरणीचा खर्च, मजुरीचा खर्च तसेच झालेल्या आर्थिक नुकसानीची योग्य ती नुकसानभरपाई तातडीने देण्यात यावी, पुनर्पेरणीसाठी आवश्यक दर्जेदार सोयाबीन बियाणे तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे.

शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून या प्रकरणी तातडीने योग्य ती कार्यवाही करावी असे निवेदनत नमूद आहे.

# दर रविवारी 'अमरावती ते चिखलदरा दर्शन' विशेष बससेवा

प्रतिनिधी १० जुलै

**अमरावती :** चिखलदरा या प्रसिद्ध पर्यटन व थंड हवेच्या ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांसाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळाने येत्या रविवार, दि. 12 जुलैपासून दर रविवारी 'अमरावती ते चिखलदरा दर्शन' बस सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

पर्यटकांना चिखलदऱ्यातील निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेता यावा यासाठी महामंडळाने आधुनिक बीएस प्रकारातील नवीन 'लालपरी' बस उपलब्ध करून दिली आहे. पर्यटकांचा प्रवास अधिक आनंददायी व्हावा म्हणून या बसला आकर्षक सजावट केली जाईल आणि बसमधील साऊंड सिस्टीमद्वारे मनोरंजनात्मक गाणी देखील वाजवली जाणार आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी या बसवर विशेषत्वाने निर्व्यसनी चालक आणि वाहकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर विशेष बस चिखलदऱ्याला पोहोचल्यानंतर पर्यटकांना गार्डन पॉंईट, देवी पॉंईट, किल्ला पॉंईट, लेक पॉंईट, पंचबोल पॉंईट, भिमकुंड पॉंईट या प्रमुख पॉंईट्सचे दर्शन घडवणार आहे. ही बस अमरावतीवरून सकाळी 8 वाजता सुटून धामणगाव मार्गे चिखलदऱ्याला पोहोचेल. तसेच चिखलदरा येथून सायंकाळी 5 वाजता परतीच्या प्रवासाला निघणार आहे. पर्यटकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, तसेच अधिक माहिती व आरक्षणासाठी प्रवाशांनी स्थानिक आगार व्यवस्थापकांशी संपर्क साधावा, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

# शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती:** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून सदर आदेश दि. 11 ते 25 जुलै 2026 च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

# मॅफेड्रॉन, गांजा या अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई

प्रतिनिधी १० जुलै



**अमरावती:** अवैधरित्या मॅफेड्रॉन (एम.डी.) तसेच गांजा या अंमली पदार्थांची विक्री करणा-या इसमांवर अमरावती शहर गुन्हे शाखे कडुन धडक कारवाई करण्यात आली.

पोलीस आयुक्त यांनी अमरावती शहरातील अवैधरित्या अंमली पदार्थाची साठवणुक, विक्री व वाहतुक करणाऱ्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करून अंमली पदार्थ विरोधात ZERO TOLERANCE POLICY राबविण्याबाबत आदेश प्राप्त झालेवरून पोलीस निरीक्षक अतुल वर, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन तसेच तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे उल्लेखनिय अशी प्रभावी कार्यवाही केली.

दि. ९ जुले रोजी गुन्हे शाखा पथक गुन्हेशाखा कार्यालयात हजर असतांना खास व विश्वासु बातमीदाराने गुन्हे शाखा अमरावती शहर येथे येवुन मॅफेडॉन (एम.डी) या अंमली पदार्थ विक्री साठी खरेदी करून बाळगले विषयी विश्वसनीय खबर दिली. इसम नामे सैफ अली आसिफ अली वय ३२ वर्ष रा, धरमकाटा जवळ, फरीद नगर, अमरावती हा मॅफेडॉन (एम.डी) तसेच गांजा या अंमली पदार्थांचा व्यवसाय करतो.

नमुद इसम व त्याचे दोन साथिदार हे दिनांक ०९/०७/२०२६ रोजी १४.०० वा. च्या सुमारास नांदगाव पेठ हददीमधील वाळकी डॅम्प कडे जाणारा रोडने मॅफेड्रॉन (एम.डी.) विक्रीच्या उददेशाणे घेवुन येणार ताब्यात घेतले त्यानंतर दोन पंच व राजपत्रीत अधिकारी यांच्या समक्ष त्यांना त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे आरोपी सैफ अली आसिफ अली वय ३२ वर्ष रा, धरमकाटा जवळ, फरीद नगर, अमरावती,,आवेजउददीन नासीरउददीन वय २० वर्ष रा, इदगाह फाटक जवळ हैदरपुरा, अमरावती, मोहम्मद तौसिफ मोहम्मद जफर, वय २४ वर्ष रा, काझी कंट्रोल जवळ, गौस नगर, अमरावती असे नाव सांगीतले. त्यावरूण त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन २२.०७ ग्रॅम (एम.डी.) मॅफेडॉन पाउडर किं.अ. ३,०१,२००/- रू, २) १ किलो १२४ ग्रॅम गांजा अंमली पदार्थ कि.अ. २२,२७०/- रू दोन मोबाईल कि.अ. ४०,०००/-रू वा असा एकूण किं.अ. ३,६३,४७०/- रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने ते जप्त करून नमुद आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन नांदगाव पेठ येथे एन.डी.पी.एस. अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

सदर आरोपी सैफ अली आसिफ अली वय ३२ वर्ष रा, धरमकाटा जवळ, फरीद नगर, अमरावती यांस सदरथा एम.डी. हा अंमली पदार्थ कोणाकडुन व कोठुन आणला याबाबत विचारणा केली असता त्यांने इरशाद खान वय २० वर्ष रा, इदगाह फाटक जवळ हैदरपुरा, अमरावती मोहम्मद तौसिफ मोहम्मद जफर, वय २४ वर्ष रा, काझी कंट्रोल जवळ, गौस नगर, अमरावती

जप्त मुददेमाल २२.०७ ग्रॅम (एम.डी.) मॅफेड्रॉन पाउडर किं.अ. ३,०१,२००/- रू , १ किलो १२४ ग्रॅम गांजा अंमली पदार्थ कि.अ. २२, २७०/- रू दोन मोबाईल कि.अ. ४०,०००/-रू ३,६३,४७०/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अमरावती शहरात एम. डी. बाळगणारे त्याचे सेवन करणारे, विक्री करणारे यांचेबाबत गोपनिय माहीती काढण्यात आली असून त्यांच्यावरही नजीकच्या काळात धडक मोहीम राबविण्याबाबत मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी आदेशीत केले आहे. सदर वी कारवाई ही पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०१ यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०२ श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे प्रांजली सोनवणे, सपोआ गुन्हे शाखा कैलास पुंडकर यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखावे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात करण्यात आली आहे.

# अखेर शेतकऱ्याचे उपोषण मागे...

## शेतकऱ्याचा हिताचा विचार करावा-- हरिदास लुंगे उपाध्यक्ष किसान मोर्चा अमरावती

प्रतिनिधी १० जुलै

**नया वाठोडा:** मोर्शी तालुक्यातील पिंपळखुटा मोठा सर्कल मध्ये येत असलेल्या नया वाठोडा येथे सोमवार दिनांक 6 जुलै रोजी सकाळी 11 वाजता उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांचे आमरण उपोषण हरिदास लुंगे उपाध्यक्ष किसान मोर्चा अमरावती यांचे मध्यस्थीने सोडण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार वृत्त असे की काही वर्षांपूर्वी नया वाठोडा पुसला पांदण रस्त्याचे डांबरीकरण झाले त्यामुळे या ठिकाणी रोड चे काम झाल्यावर शेतकऱ्याचे रस्त्यावर आणि पाणी जायचे ठिकाणी सिमेंट पायल्या टाकू असे बोलले होते परंतु जणू शेतकऱ्यांना असे चॉकलेट देऊन संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांनी पळ काढला असे समजून आले. त्यामुळे काही शेतकऱ्यांना शेतात जायला तर काहीना शेतातील पाणी जायला अडचण निर्माण झाली असाच प्रकार शेतकरी विश्वेश्वर वानखडे यांचे सोबत घडला त्यांचे मते शेताचे पाणी पिढ्यानपिढ्या उतारा चे दिशेने नैसर्गिक प्रवाहानुसार रोड चे खालचे बाजूनी जात होते परंतु हे पाणी जाण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या पायल्या नसल्यामुळे शेतात पाणी साचत होते त्यामुळे त्याचे पिकाचे नुकसान होत असल्यामुळे त्यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोर्शी यांचे कडे अर्ज केला असता त्या अर्जावर या विभागाने कारवाई करून 2021 मध्ये सिमेंट पायल्या टाकून दिल्या होत्या आणि ते पाणी पाणंद रस्त्याने जाऊन संजय कोल्हे यांच्या शेतातून जात होते असे वानखडे यांनी सांगितले ,परंतु संजय कोल्हे यांनी 2024 मध्ये ते पाणी अडवून पांदण रस्ता व शेजारील पाटबंधारे विभागाच्या हद्दीतील माती चा भराव काढून आपल्या शेतात भरला आणि पाणी कालव्या मध्ये काढून दिले त्यामुळे कालव्याचे नुकसान झाले असे संबंधित अधिकारी जैस्वाल साहेब यांना माहिती मिळाली असता यांनी सखोल चौकशी न करता सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोर्शी आणि शेतकरी यांना नोटीस बजावली आणि या नोटीस ला अनुसरून या विभागाने सुद्धा शहानिशा न करता तत्काळ येऊन त्या पायल्या काढून विरुद्ध दिशेने टाकून दिल्या म्हणजेच या दोन्ही विभागाने चुकीची कारवाई केली असे लक्षात येते यामुळे या बाजूचे शेतकरी यांचे पिकाचे नुकसान होणार म्हणून त्यांनी त्या पायल्या बंद केल्या त्यामुळे यावर्षी या प्रकरणाला पुन्हा उजाळा मिळाला असता संबंधित दोन्ही विभागाने संयुक्त पाहणी केली.

परंतु पुन्हा चुकीचा निर्णय देऊन शेतकऱ्यावर अन्याय च केला त्यामुळे पुरुषोत्तम काकडे ,जयकुमार अमझरे, रामकृष्ण अमझरे या शेतकऱ्यांनी दिनांक 6 जुलै रोजी 11 वाजता आमरण उपोषण सुरू केले असता संबंधित अधिकारी, नायब तहसीलदार,पोलिस प्रशासन यांनी भेटी घेऊन प्रकरण जाणून घेतले पण काही केल्या उपोषण सुटेल असे दिसत नसल्यामुळे दुसऱ्या दिवशी श्री.उमक साहेब कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग अमरावती यांनी स्वतः येऊन स्थळ पाहणी केली परंतु आम्ही आमचे कालव्या मध्ये कोणतेच पाणी घेऊ शकत नाही व इथे कुठलेच बांधकाम करू शकत नाही असा निर्णय दिला असता अखेर हरिदास लुंगे उपाध्यक्ष किसान मोर्चा अमरावती व त्यांचे सहकारी यांच्या मध्यस्थीने दिनांक 7 जुलै रोजी नायब तहसीलदार वानखडे साहेब, पाटबंधारे विभाग चे आडे साहेब,, सार्वजनिक बांधकाम उपविभाग मोर्शीचे बोडखे साहेब यांनी लेखी आश्वासन देऊन प्रेमराज वानखडे पोलिस पाटील पुसला यांचे समक्ष निर्णय दिला व निंबू सरबत पाजून अखेर उपोषण सोडण्यात आले. यावेळी जैस्वाल साहेब , जावरकर साहेब,धोटे साहेब ,गावातील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रत्येक आस्थापनांनी 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' स्थापित करा

प्रतिनिधी १० जुलै

**अमरावती:** कामाच्या ठिकाणी नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी, तक्रारींची चौकशी करण्यासाठी आणि छळ करणाऱ्या व्यक्तीस शिक्षा करण्यासाठी प्रत्येक शासकीय व खाजगी आस्थापनेत 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' (Internal Complaints Committee - ICC) स्थापन करणे कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या शासकीय किंवा खाजगी कार्यालयांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी ही समिती त्वरित स्थापन करावी, असे आवाहन अमरावतीच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३' मधील तरतुदींनुसार सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक प्राधिकरणाची कार्यालये, खाजगी कार्यालये तसेच १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असलेल्या संस्था, संघटना, मंडळ, कंपनी, कारखाना, रुग्णालय, शाळा, महाविद्यालये, हॉटेल्स, दुकाने, बँका आदींच्या प्रमुखांनी व मालकांनी आपापल्या ठिकाणी ही समिती स्थापन करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने देखील स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. नियमांनुसार अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन न करणाऱ्या संबंधित कार्यालय प्रमुख किंवा मालकांना ५० हजार रुपयांपर्यंत दंड करण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. त्यामुळे सर्व आस्थापनांनी या प्रक्रियेत तपासणीसाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे. शासकीय व खाजगी कार्यालयांनी अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन केल्यानंतर, वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल 'जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, अमरावती' येथे सादर करावा. तसेच यापुढील मासिक व त्रैमासिक अहवालही वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

# दर्यापूर तालुक्याचा अचलपूर अपर जिल्हाधिकारी कार्यालयात समावेश करण्यास अडते व्यापारी असोसिएशनचा तीव्र विरोध

## दर्यापूर उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन

प्रतिनिधी १० जुलै



**दर्यापूर :** अमरावती जिल्हा प्रशासकीय पुनर्रचना अंतर्गत प्रस्तावित अचलपूर येथील अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात दर्यापूर तालुक्याचा समावेश करण्याच्या प्रस्तावाला दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कार्यरत असलेले अडते व्यापारी च्या असोसिएशन दर्यापूरच्या वतीने आज तीव्र विरोध करीत दर्यापूर उपविभागीय अधिकारी राजेश हांडे तहसीलदार डॉ. कानडजे मार्फत शासनाला निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दर्यापूर तालुक्यातील ग्रामीण व शहरी नागरिकांचे प्रशासकीय, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक व्यवहार अमरावतीशी अधिक निगडित आहेत. अशा परिस्थितीत दर्यापूर तालुक्याचा समावेश अचलपूर येथील अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात केल्यास सर्वसामान्य नागरिकांना अतिरिक्त प्रवास, वेळेचा अपव्यय, आर्थिक भुर्दंड तसेच विविध शासकीय कामांसाठी अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागेल.

त्यामुळे दर्यापूर तालुक्याचा प्रस्तावित अचलपूर अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समावेश करण्यात येऊ नये, अशी ठाम मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी असोसिएशन अध्यक्ष सुधाकरराव टोपले उपाध्यक्ष उपाध्यक्ष गुणवंत पाटील गावंडे हिंगणीकर, राजेश भाऊ राठी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, संचालक प्रभाकर पाटील तराळ, अशोक भाऊ मुंदडा, भैय्यासाहेब देशमुख, अनिश शेठ घाणीवाले, उज्वल अडोकार,प्रवीण शेठ पणपालिया कृष्णा राठी, मंगेश देशमुख शिवर, अखिलेश कोकाटे, विक्रम खेतान, अमित सोनी, कार्तिक भैय्या, संपूर्ण अडते व्यापारी असोशियन कार्यकर्ते संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# रिसोड बाजार समितीमध्ये अनियमितीची हद्द, ११ भूखंडांचे भाडेपट्टा करारनामे रद्द !

## आ. आशिष देशमुखांच्या तारांकित प्रश्नानंतर मंत्रालयातून मोठी कारवाई

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●




वाशीम जिल्ह्यातील रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (APMC) मुख्य आवारातील विकास आराखड्यात (ले-आऊट प्लॅन) पणन संचालकांची पूर्वपरवानगी न घेता आणि कायदेशीर अटींचे उल्लंघन करून करण्यात आलेले फेरबदल शासनाने अत्यंत गांभीर्याने घेतले आहेत. या प्रकरणी दोषींवर कार्यवाही करत, पणन संचालनालयाने रिसोड बाजार समितीच्या वादग्रस्त मंजुरीसह तब्बल ११ भूखंडांचे भाडेपट्टा करारनामे रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत.

पुणे येथील पणन संचालनालयाने २९ मे २०१९ रोजी रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गट क्रमांक १०/६ मधील मुख्य आवाराच्या विकास आराखड्याला (ले-आऊट प्लॅन) मंजुरी दिली होती. ही मंजुरी देताना विकास आराखड्याला स्थानिक सक्षम प्राधिकरण म्हणजेच 'रिसोड नगरपरिषद' यांची अंतिम मंजुरी घेणे कायदेशीररीत्या बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, रिसोड बाजार समितीने या अटींना पूर्णपणे केराची टोपली दाखवत, कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची व पणन संचालकांची पूर्वपरवानगी न घेता विकास आराखड्यात परस्पर आणि बेकायदेशीरपणे फेरबदल केले. हा गंभीर प्रकार मे २०२६ मध्ये शासनाच्या निदर्शनास आला होता.

**आ. डॉ. आशिष देशमुख यांनी विधानसभेत केला तारांकित प्रश्न**

या संपूर्ण भ्रष्टाचाराच्या आणि नियमबाह्य कारभाराच्या विरोधात सावनेरचे आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ४०३१० द्वारे शासनाला धारेवर धरले होते. रिसोड बाजार समितीने केलेल्या या नियमबाह्य कृत्यावर शासनाने काय चौकशी केली आणि संबंधितांवर काय कारवाई केली, असा सवाल त्यांनी पणन मंत्र्यांसमोर उपस्थित केला होता.या संवेदनशील प्रकरणाची चौकशी करण्यासाठी तात्काळ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगाव खंडेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने सखोल तपास करून २५ मे २०२६ रोजी आपला अहवाल शासनाला सादर केला. या अहवालात बाजार समितीने अटींचे उल्लंघन केल्याचे स्पष्टपणे सिद्ध झाले. या अहवालाच्या अनुषंगाने पणन मंत्र्यांच्या वतीने श्री. जयकुमार रावल यांनी विधानसभेत उत्तर देताना मोठी घोषणा केली. पणन संचालनालयाने ११ जून २०२६ रोजीच्या आदेशान्वये रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीने १५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सभेत घाईघाईने मंजूर केलेला वादग्रस्त ठराव क्र. ५(१) पूर्णपणे रद्द बातल केला आहे. शासनाने केवळ ठराव रद्द करून न थांबता, बाजार समितीच्या मुख्य यार्डमधील सर्व्हे नं. १०/२ मधील भूखंड व सर्व्हे नं. १०/६ मधील भूखंड अशा एकूण ११ भूखंडांबाबत करण्यात आलेले भाडेपट्टा करारनामे तात्काळ रद्द करण्याची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी या ११ भूखंडांना भाडेपट्ट्याने देण्याबाबत जी मूळ मान्यता देण्यात आली होती, ती मान्यताही पणन संचालनालयाने ११ जून २०२६ च्या पत्रान्वये अधिकृतपणे रद्द केली आहे.या प्रकरणाची संवेदनशीलता पाहता, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अवर सचिव माधवी सं. शिंदे यांनी २३ जून २०२६ रोजी पत्र पाठवून कार्यकारी संचालक (महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे) आणि पणन संचालक (पुणे) यांना तात्काळ या तारांकित प्रश्नाबाबतचा भागनिहाय वस्तुस्थितीदर्शक उत्तर आणि अनुषंगिक सुस्पष्ट माहिती दोन दिवसात शासनास सादर करण्याचे आदेश दिले आहेत. नियमबाह्य काम करणाऱ्या आणि शासकीय अटी पायदळी तुडवणाऱ्या संस्थांना व अधिकाऱ्यांना हा शासनाचा फार मोठा इशारा मानला जात आहे. या कारवाईमुळे आता रिसोड बाजार समितीच्या तत्कालीन कारभाऱ्यांचे धाबे दणाणले असून, पुढील फौजदारी किंवा प्रशासकीय कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एमडी (मेफोडान) अमली पदार्थीची विक्री करणारे तीन आरोपी अटकेत !

***१ लाख ९३ हजाराचा मुद्देमाल जप्त**

***कारंजातील तरुण आमली पदार्थाच्या विळख्यात**



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा शहर येथे गुप्त बातमीदाराकडुन माहीती प्राप्त झाली की, सावरकर चौक जवळील आय.बी.टावर परिसराम २ इसम एम.डी अमली पदार्थ जवळ बाळगुन विकी करीता बसलेले आहे अशी माहीती प्राप्त झाल्याने वरिष्ठांचे आदेशाने गुप्त बातमी प्रमाणे सदर ठिकाणी गेलो असता सदर ठिकाणी खबर प्रमाणे ०२ इसम एका मोटार सायकल जवळ बसलेले दिसले पोलिसांना पाहुन ते त्याचे मोटार सासयकल सोडुन पळुन जात असतांना त्यांचा पाठलाग करून स्टॉपच्या मदतीने त्यांना पकडण्यात आले.

आरोपीचे नाव शेख सुफी शेख लाल वय १९ वर्ष रा.शेलु (बाजार) ता. मंगरूळपिर जि.वाशिम हल्ली मुक्काम आनंद नगर कारंजा, शेख सोहेल शेख रहेमान खान वय २५ वर्ष, रा.भारतीपुरा ता.कांरजा (लाड) असे असून त्यावरून त्यांना त्यांची पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याचें जवळ अमली पदार्थ एम.डी.(मेफोडान) मिळुन आल्याने सदर एम.डी.ची ईलेक्ट्रीक काटयावर मोजणी केली असता त्याचे एकुण वजन ७.४१ ग्रॅम त्याची एकुण किं.२२,३३० रू.चा मुदद्दे माल बाळगतांना समक्ष मिळुन आला तसेच नमुद आरोपींचे ताब्यात मो.सा. क्र.एम. एच.३७ ए.एम. ०३२६ कीं.अंदाजे १ लाख रु व तिन मोबाईल कीं. ७० रुपये नगदी असा एकुण १ लाख ९३ हजार २५० रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असे सांगीतले नमुद तिन्ही आरोपींचे हे कृत्य हे कलम ८ (क), २२(ब), २९ एन.डी.पी.एस.१९८५ ?क्ट प्रमाणे त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येवुन आरोपी यास अटक करण्यात आली. सदर ची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक निकेश खाटमोडे, पो. अधिक्षक कार्या. वाशिम, अप्पर पोलीस अधिक्षक लता फड मँडम, उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक अमर चोरे, सपोनि जयदिप पवार, पोउपनि विशाल बोरकर, पोहवा गणेश जाधव, पोहवा मयुरेश तिवारी, पोहेकाँ अजय धनकर, पोहवा उमेशकुमार बिबेकर, पोका अनिस निमसुरवाले, पोकाँ अमित भगत, पोका मोहम्मद परसुवाले, पोका आकाश खंडारे, मपोका पोर्णीमा मोटे यांनी केली आहे. पुढील तपास पोउपनि गजानन पत्रे पोस्टे कारंजा शहर हे करित आहे.

## थोडक्यात

### रिसोड- वाशिम बस गाडी सुरू करा- विद्यार्थ्यांच्या हितासाठी-नारायण आरू

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



रिसोड तालुक्यातील रिसोड एस टी आगाराअंतर्गत येणाऱ्या रिसोड आगाराची एस टी बस गाडी २०२१ते २०२४ सालामध्ये सकाळच्या वेळेत ६.०० वा.सुरु असणारी एस टी बस यावर्षी कोणतेही कारण नसतांना बंद केली.त्यामुळे चिखली, वनोजा, आसेगावपेन, रिठद, मोहजारोड, नागठाणा येथून वाशिम व शहरातील आणखी शहरालगत कॉलेजला जाण्यासाठी व इतर मेडिकल विद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी/ विद्यार्थीनी यांना सकाळच्या सत्रातील कॉलेजला जाण्यासाठी सर्वांनाच उशीर होत आहे.त्यामुळेच हि बंद केलेली एस टी बस गाडी सुरू करावी अशी मागणी रिसोड शिवसेना तालुका प्रमुख नारायण आरु यांनी दि.८ जुन २०२६ रोजी आगारप्रमुख यांचेकडे निवेदन देण्यात आले.या निवेदनाची दखल आगार प्रमुखांनी घ्यावी.अशी मागणीही विद्यार्थी व पालक वर्गातून होत असल्यानेच हि मागणी करण्यात आली.

### ठेकेदार राजुभाऊ उर्फ सुधिर देशमुख यांना मातृशोक

**प्रमिलाताई देशमुख यांचे निधन**



**रिसोड :** ठेकेदार राजुभाऊ उर्फ सुधिर देशमुख (रिसोड) यांच्या मातोश्री, कै. गं. भा. प्रमिलाताई गणेशराव देशमुख यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने देशमुख परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्यावर गुरूवारी दि. ०९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वा. अंत्य संस्कार करण्यात आले. अस्थि विसर्जनाचा कार्यक्रम उद्या शनिवार दि. ११ रोजी १० वा. स्मशान भूमी रिसोड येथे ठेवण्यात आला आहे. त्यांच्या पश्चात सुधीर गणेशराव देशमुख, अतुल गणेशराव देशमुख नितीन गणेशराव देशमुख या मुलांसह मोठा आप्त परिवार आहे.

## शासकीय नियम ; अप्पर तहसील केनवडलाच ठेवा कायम !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

केनवड : रिसोड तालुक्यातील प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाचे मुख्यालय केनवड येथून अन्यत्र हलविण्याच्या चर्चांमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शासनाने घेतलेला मूळ निर्णय कायम ठेवत अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच सुरू करावे, या मागणीसाठी तब्बल ११ ग्रामपंचायती एकवटल्या असून, ठरावांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने २३ जून २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार रिसोड तालुक्यातील केनवड येथे प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र हे कार्यालय अन्यत्र हलविण्यात येऊ नये आणि त्याचे मुख्यालय केनवड येथेच कायम ठेवावे, अशी एकमुखी मागणी केनवड महसूल मंडळातील ग्रामस्थांनी केली आहे. यासंदर्भात बुधवारी (दि. ८ जुलै) तहसीलदार, रिसोड यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, वाशिम यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.




केनवड हे रिसोड तालुक्यातील विकसित, मध्यवर्ती व सर्व सुविधांनी सुसज्ज गाव असून परिसरातील १५ ते २० गावांचे प्रमुख प्रशासकीय, शैक्षणिक, आरोग्य व व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते. येथे विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँका, सेतू सुविधा केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, पोस्ट कार्यालय, महावितरण कार्यालय, तलाठी कार्यालय, नाफेड खरेदी केंद्र, कृषी सेवा केंद्रे, पेट्रोल पंप, शाळा-महाविद्यालये, व्यापारी प्रतिष्ठाने आणि आठवडी बाजार यांसारख्या सर्व महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांची बहुतांश शासकीय कामे केनवड येथेच पार पडतात.सध्या महसूल विभागाच्या कामांसाठी नागरिकांना ३५ ते ४० किलोमीटर अंतरावरील रिसोड येथे जावे लागते. त्यामुळे शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांचा वेळ, पैसा व श्रम यांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.केनवड हे जिल्हा व तालुक्याच्या सीमावर्ती भागात राज्य महामार्गालगत वसलेले असून येथे शासकीय जागा व इमारत उपलब्ध आहे. त्यामुळे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक मूलभूत सुविधा येथेच उपलब्ध असल्याने प्रशासनाने लोकहिताचा विचार करून कार्यालयाचे मुख्यालय केनवड येथेच कायम ठेवावे, अशी आग्रही मागणी करण्यात आली.या मागणीला बळकटी देण्यासाठी केनवड, नंधाना, कळमगव्हाण, कुकसा-गणेशपूर, जोगेश्वरी, तपोवन, जायखेडा, अंचळ, नेतंसा, कोयाळी (बु.) आणि जांब आढाव या ११ ग्रामपंचायतींनी ठराव मंजूर करून त्याच्या प्रती निवेदनासोबत जोडल्या आहेत.

**११ ग्रामपंचायतींचा एकमुखी पाठिंबा**

केनवड, नंधाना, कळमगव्हाण, कुकसा-गणेशपूर, जोगेश्वरी, तपोवन, जायखेडा, अंचळ, नेतंसा, कोयाळी (बु.) आणि जांब आढाव या ग्रामपंचायतींनी प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाचे मुख्यालय केनवड येथेच कायम ठेवण्याचे ठराव मंजूर केले असून, परिसरातील हजारो नागरिकांच्या हितासाठी शासनाने लोकभावनेचा आदर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## रिसोड तहसील मध्ये राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याची एस.आय.आर संदर्भात बैठक

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



रिसोड मालेगाव विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकीय पक्षाच्या मुख्य पदाधिकाऱ्यांची बैठक आज दिनांक ८ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वा. मतदान नोंदणी अधिकारी ३३- रिसोड विधानसभा मतदारसंघाच्याच्या निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली देवकर यांनी ही बैठक आयोजित केली होती. यासाठी प्रत्येक राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी दखल घेऊन आपण नेमलेल्या बि एल ए यांना सूचना द्याव्यात. असे आवाहन यावेळी रिसोड विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली देवकर यांनी यावेळी मार्गदर्शन करताना आवाहन केले आहे

यावेळी उपस्थितांमध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रतीक्षा तेजनकर, नायब तहसीलदार (निवडणूक विभाग) जवादे, रिसोड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी डांगे मॅडम, गजानन कांबळे, व इतर सहकारी यावेळी उपस्थित होते.

तर राजकीय पक्षाचे पदाधिकारी म्हणून नारायणराव आरू- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), तेजराव पाटील वानखेडे-राष्ट्रवादी काँग्रेस (शरद चंद्र पवार), रामेश्वर देवकर-भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, योगेश वाळके -महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मच्छिंद्र पाटील ढोणे शिवसेना (शिंदे गट), रवी तिडके- वंचित बहुजन आघाडी व इतर पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## ४५ हजार लोकसंख्येसाठी फक्त १३ घंटागाड्या; रिसोडच्या घनकचरा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड शहरात सुमारे ४५ हजार लोकसंख्या असलेल्या रिसोड शहरातील घनकचरा व्यवस्थापनाची माहिती माहिती अधिकारातून समोर आली आहे. नगर परिषदेकडून उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार, शहरात घराघरातून कचरा संकलनासाठी १३ घंटागाड्या कार्यरत आहेत. या प्रत्येक घंटागाडीवर मिळून १३ चालक व १३ लेबर कार्यरत आहेत.




याशिवाय, संकलित कचरा डेपोपर्यंत नेण्यासाठी ४ ट्रॅक्टर वापरण्यात येतात. या ट्रॅक्टरवर ४ चालक व १६ लेबर कार्यरत असल्याची माहिती नगर परिषद प्रशासनाने दिली आहे. अशा प्रकारे घनकचरा व्यवस्थापनासाठी एकूण १७ चालक आणि २९ लेबर कार्यरत आहेत. दररोज वाढणारी लोकसंख्या, नवीन वसाहती आणि शहराचा विस्तार लक्षात घेता केवळ १३ घंटागाड्या आणि उपलब्ध मनुष्यबळ पुरेसे आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेक भागांत कचरा संकलन वेळेवर होत नसल्याच्या तक्रारीही वेळोवेळी समोर येत असतात. त्यामुळे शहराच्या स्वच्छतेसाठी घंटागाड्यांची संख्या वाढविणे, अधिक कर्मचारी उपलब्ध करून देणे आणि घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

'रिसोड शहरात घनकचरा संकलनाचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. उपलब्ध घंटागाड्या, ट्रॅक्टर आणि मनुष्यबळाच्या माध्यमातून दररोज कचरा संकलन केले जाते. शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अतिरिक्त वाहने व कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. नागरिकांनीही ओला व सुका कचरा वेगळा करून स्वच्छता मोहिमेला सहकार्य करावे.'

**सतीश शेवदा,**
मुख्याधिकारी नगरपरिषद रिसोड


## जि.प शाळेचा डिजिटलचा गाजावाजा; पण शिक्षकच नाहीत !

***२ शिक्षकांवर ७ वर्गांचा भार; एकतर शिक्षक बीएलओच्या कामावर *जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण वाऱ्यावर**

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

शासनाकडून जिल्हा परिषद शाळांना डिजिटल करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून सीसीटीव्ही, स्मार्ट शिक्षण साहित्य व विविध आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मात्र दुसरीकडे शिक्षकांची तीव्र कमतरता, निवडणुकीसह इतर प्रशासकीय कामांचा वाढता भार आणि जीर्ण शाळा इमारती यामुळे विद्यार्थ्यांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण धोक्यात आले आहे. रिसोड तालुक्यातील पिंप्री सरहद्द येथील जिल्हा परिषद शाळेची सद्यस्थिती ही याचेच ज्वलंत उदाहरण ठरत असून, 'डिजिटल शाळा'च्या गाजावाजामागे शिक्षणाची वास्तव परिस्थिती झाकोळली जात असल्याचे चित्र समोर आले आहे.









पिंप्री सरहद्द येथील जिल्हा परिषद शाळेची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत असून, शासनाच्या 'डिजिटल शाळा' संकल्पनेमागे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रश्न झाकोळला जात असल्याचे वास्तव समोर आले आहे.इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंत तब्बल सात वर्ग असलेल्या या शाळेत सध्या केवळ दोनच शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी एक शिक्षक बीएलओ म्हणून निवडणूक विभागाच्या विविध कामांमध्ये सतत व्यस्त असल्याने विद्यार्थ्यांना नियमित अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. सध्या सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण मोहिमेमुळे त्यांचा बहुतांश वेळ निवडणुकीच्या कामात जात आहे. दुसरीकडे उर्वरित शिक्षकही रजेवर असल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण अक्षरशः वाऱ्यावर आले आहे.

शासनाने शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे, डिजिटल शिक्षण साहित्य आणि विविध आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र, शिक्षकच नसतील तर या साधनांचा उपयोग कोण करणार? असा संतप्त सवाल पालक आणि ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

शाळेची इमारतही अत्यंत जीर्ण अवस्थेत असून वर्गखोल्यांवरील पत्रे फुटल्यामुळे पावसाळ्यात छत गळते. अनेक ठिकाणी भिंती धोकादायक बनल्या आहेत. अशा असुरक्षित वातावरणात विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे.मागील वर्षापर्यंत या शाळेत तीन शिक्षक कार्यरत होते. त्यामध्ये मुख्याध्यापकांचाही समावेश होता. मात्र, मुख्याध्यापक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांची जागा अद्याप भरली गेली नाही. परिणामी, आता केवळ दोन शिक्षकांवर सात वर्गांची जबाबदारी आली आहे. शिक्षकांच्या कमतरतेमुळे अनेक पालक आपल्या पाल्यांना इतर शाळांमध्ये प्रवेश देत असून त्यामुळे पटसंख्याही घटत आहे.

त्याच पटसंख्येचे कारण पुढे करून नवीन शिक्षकांची नियुक्ती होत नसल्याने हे दुष्टचक्र कायम राहिले आहे.पालक व ग्रामस्थांनी शाळेत तातडीने मुख्याध्यापकांसह आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करावी, बीएलओसारख्या अतिरिक्त कामांचा भार कमी करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे तसेच जीर्ण शाळा इमारतीची तातडीने दुरुस्ती करून सुरक्षित व दर्जेदार शैक्षणिक वातावरण निर्माण करावे, अशी जोरदार मागणी केली आहे. 'डिजिटल फलक, सीसीटीव्ही आणि प्रोजेक्टरपेक्षा विद्यार्थ्यांना शिक्षकांची अधिक गरज आहे; अन्यथा 'डिजिटल शाळा' ही केवळ कागदावरील संकल्पना ठरेल,' अशी भावना पालकांनी व्यक्त केली.

## कारंजा येथे जन आक्रोश धरणे आंदोलन



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

दिल्ली येथे जंतर मंतर या ठिकाणी चालू असलेल्या विद्यार्थी आंदोलनास आणि शेतकऱ्यांना बिनशर्त कर्जमुक्ती व पिक विमा मिळण्याकरता कारंजा येथे तहसील कार्यालयावर दिनांक ७ जुलै २०२६ रोजी दुपारी बारा वाजता पासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत एक दिवसीय जन आक्रोश धरणे आंदोलन करण्यात आले या धरणे आंदोलनाला भरपूर असा प्रतिसाद मिळाला असून या आंदोलनात प्रत्यक्ष दोनशे ते अडीचशे लोकांनी स्वाक्षरी देऊन भविष्याची गरज समजून घेऊन पाठिंबा दिला.

आणि मुलं सुद्धा मेहनत करतात अभ्यास करतात परंतु नीट परीक्षेचे पेपर तसेच सीईटी टी ई टी व इतर स्पर्धा परीक्षेचे पेपर फुटल्याने आपली मेहनत आणि आई-वडिलांनी आपल्या शिक्षणासाठी केलेला खर्च व्यर्थ गेल्यामुळे लाखो विद्यार्थी हताश झाले काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

यावेळी माजी नगराध्यक्ष अरविंदजी लाठीया, गजानन भाऊ आमदाबादकर, धहंसराज शेंडे, भारत भूषण प्रधान, प्रदीप भाऊ वानखडे, दिलीप रोकडे, कैलास डोंगरे, गजानन लोखंडे, दिघडे साहेब, विनायक पद्मगिरवार, टी.व्ही राठोड, सागर पाचपुते, किशोर मानकर सर, मनोज कानकिरड, विजय मनवर सर, डॉ.रमेश चंदनशिव, अरुण चव्हाण, किरण ठाकरे, अजय रंगे यांचे सहकार्य लाभले.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# शेकडो वैद्यकीय बिले रोखल्याने तीव्र आंदोलनाचा इशारा

## खामगावात कामगारांचा संताप! ईएसआयसी कार्यालयावर धडक

प्रतिनिधी १० जुलै

**खामगाव :** कामगारांच्या हक्काच्या वैद्यकीय उपचाराची सुमारे २५० ते ३०० बिले कोणतीही पूर्वकल्पना न देता नॉट अॅन इमर्जन्सी चे कारण देऊन सरसकट नाकारल्यामुळे खामगाव येथील कर्मचारी राज्य विमा महामंडळ कार्यालयावर शेकडो कर्मचाऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत ९ जुलै धडक दिली. प्रशासनाचा हा निर्णय अत्यंत असंवेदनशील आणि कामगारविरोधी असल्याचा आरोप करत, येत्या १५ दिवसांत बिले मंजूर न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा कामगारांनी दिला आहे.

या संदर्भात कर्मचाऱ्यांच्या वतीने ईएसआयसी कार्यालयाच्या व्यवस्थापकांना एक निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे प्रशासनाच्या मनमानी कारभारावर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित

करण्यात आले आहेत. यामध्ये नमूद आहे की, अचानक नियम बदलले कसे? मागील ५ ते ६ वर्षांपासून याच स्वरूपाची वैद्यकीय बिले नियमितपणे मंजूर केली जात आहेत. मग अचानक एकाएकी नियमांमध्ये असा कोणता बदल झाला, ज्यामुळे शेकडो बिले एकाच वेळी नाकारण्यात आली?, सरसकट कपातीचा निकष काय? प्रत्येक रुग्णाची परिस्थिती आणि आजार वेगवेगळा असतो. सर्वांना एकच कारण देऊन बिले फेटाळणे हा बेजबाबदार कारभार आहे.

मागील मंजुरी बेकायदेशीर होती का? जर आताचे नियम योग्य असतील, तर मागील ५-६ वर्षांत मंजूर झालेली बिले बेकायदेशीर होती का? तसे असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई झाली ? आणि जर ती कायदेशीर होती, तर आताची बिले का रोखली? असे अनेक सवाल उपस्थित करून ईएसआयसी कार्यालयातील व्यवस्थापकांना कामगारांनी धारेवर धरले.

### 15 दिवसांचा 'अल्टिमेटम'

कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी प्रशासनाची प्रशासनाला दिलेल्या निवेदनात स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, येत्या १५ दिवसांच्या आत या सर्व २५० ते ३०० बिलांची पुनरतपासणी करून ती तात्काळ मंजूर करण्यात यावीत. जर या मुदतीत तोडगा निघाला नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीची आणि कायदा व सुव्यवस्थेची पूर्ण जबाबदारी ईएसआयसी प्रशासनाची राहील, असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

यावेळी तेथील व्यवस्थाप कपिल बागेश्वर यांनी सदर निवेदन स्विकारून तात्काळ वरिष्ठ कार्यालयाला पाठवून मागण्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या आंदोलनामुळे खामगाव परिसरात कामगारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. निवेदनावर नरेंद्र कळसकार, प्रकाश वानखडे, अजयसिंह राजपूत, निलेश तायडे, मनोज मुकुंद, पवन धंदर, गणेश शिंदे, गजानन घ्यार, निलेश श्रीनाथ, यांच्यासह शेकडो कामगारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मलकापूर न्यायालयात बचाव पक्षाचा युक्तिवाद यशस्वी...!

## विवाहिता आत्महत्या प्रकरणात ४ आरोपी निर्दोष,शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

प्रतिनिधी १० जुलै

**मलकापुर:** विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केलेल्या विवाहितेच्या प्रकरणात, नांदुरा तालुक्यातील सासरच्या मंडळींना न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. नांदुरा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या छळ आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यातून (अपराध क्र.५९/२०२६) मयत विवाहितेचे सासू, सासरे, दीर आणि जेठ यांची मलकापुर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी 'डिस्चार्ज' (दोषमुक्त) करत निर्दोष मुक्तता केली आहे. वडाळी (ता. नांदुरा) येथील रहिवासी वर्षा जयंत वक्ते हिने दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली होती. या दुर्दैवी घटनेनंतर, मयत विवाहितेचा भाऊ संदीप फरफट याने नांदुरा पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरून मयतीचे पती जयंत वक्ते, सासू शांताबाई वक्ते, सासरे वामन वक्ते, दीर अमोल वक्ते आणि जेठ अनंता वक्ते यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम १०८, ८५ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास अधिकाऱ्यांनी या प्रकरणी तपास पूर्ण करून मलकापूर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र (चार्जशीट) दाखल केले होते. या प्रकरणाचा सत्र खटला क्रमांक ४१/२०२६ असा न्यायालयात चालवला जात होता. खटल्याची सुनावणी सुरू असताना, आरोपी क्रमांक २ ते ५ (सासू, सासरे, दीर व जेठ) यांच्या वतीने न्यायालयात 'डिस्चार्ज अर्ज' (दोषमुक्तीचा अर्ज) दाखल करण्यात आला. "आमचा या गुन्ह्याशी कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. कौटुंबिक वादातून केवळ आकसापोटी आणि खोटेपणाने आम्हास या गुन्ह्यात गोवण्यात आले आहे," असा युक्तिवाद आरोपींच्या वतीने करण्यात आला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर केलेली कागदपत्रे पडताळून पाहिली. आरोपी पक्षाचा कायदेशीर युक्तिवाद ग्राह्य धरत, न्यायालयाने आरोपी क्रमांक २ ते ५ यांच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा किंवा छळ केल्याचा कोणताही सबळ पुरावा प्रथमदर्शनी दिसून येत नसल्याचे निरीक्षण नोंदवले. परिणामी, न्यायालयाने या चारही आरोपींना दोषमुक्त (Discharge) करत त्यांची या प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली. बचाव पक्षाचा युक्तिवाद: या प्रकरणात आरोपींच्या वतीने अॅड. जी.डी.पाटील आणि अॅड.एम.एल. टावरी (नांदुरा) यांनी न्यायालयात अतिशय प्रभावी व कायदेशीर युक्तिवाद केला. त्यांना या कामी अॅड. शुभांगी कावस्कर, अॅड. उदय कपले आणि अॅड. निरज ताकवाले यांनी मोलाचे सहकार्य केले.

# सोयाबीन बीज उत्पादक कंपनीवर कार्यवाही करा- भाजपाची मागणी

प्रतिनिधी १० जुलै

## शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

**खामगांव :** शेगांव तालुक्यातील अनेक गावांमध्ये हजारो शेतकऱ्यांनी सोयाबीन बीयाणे पेरले परंतु पुरेसा पाऊस पडूनही शेकडो शेतकऱ्यांच्या शेतातील बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे आज दि.०९/०७/२०२६ रोजी भाजपाच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच या बीज उत्पादक कंपन्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी या मागणीसाठी तहसिलदार व उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या मार्फत मा.ना. श्री दत्ताजी भरणे, कृषी मंत्री व ना अॅड आकाशदादा फुंडकर कामगार मंत्री तथा आमदार खामगांव विधानसभा मतदार संघ यांना भारतीय जनता पार्टी खामगांवच्या वतीने निवेदन देण्यात आले.

खामगांव शेगांव तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सोयाबीनचा पेरणा केला परंतु पुरेसा पाऊस पडूनही सोयाबीनचे बियाणे उगवले नाही. यामुळे शेकडो शेतकऱ्यांच्या शेकडो हेक्टर वरील सोयाबीनचा पेरा वाया गेला असून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा निकृष्ट बियाण्यांबाबत संबंधीत कृषी केंद्राकडे बियाणे बदलवून मागण्यास शेतकरी गेले असता त्यांनी बियाणे बदलवून देण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे शेतकऱ्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला होता. शेतकऱ्यांच्या मागणीला वाचा फोडण्यासाठी भारतीय जनता पार्टी खामगांव तर्फे आज दि. ९ जुलै २०२६ रोजी उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या मार्फत मा.ना.श्री दत्ताजी भरणे, कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य यांना तसेच तहसिलदार खामगांव यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष नरेंद्र शिंगोट, श्यामसुंदर पाटेखेडे, तसचे भाजपा पदाधिकारी राजेश तेलंग, चेतन फुंडकर, महादेव देशमुख, प्रदिप हरमकार, नंदकिशोर टिकार, राजेश टिकार, दत्तात्रय टिकार,प्रविण टिकार, विठ्ठल अंभोरे, वैभव ढोरे, भगवानसिंग सोळंके, शालीकराम राठोड, युवराज मोरे, मुरलीधर दळवी, योगेश राऊत, दादाराव चव्हाण यांची उपस्थिती होती.

# उन्नती बियाणे प्रकरणाने वानखेड पेटले; शेतकऱ्यांचा संताप उसळला!

## "पंचनामा करा, वैज्ञानिक तपासणी करा; दोषींना शिक्षा आणि नुकसानभरपाई द्या"

प्रतिनिधी १० जुलै

**संग्रामपूर :** तालुक्यातील वानखेड परिसरात रवि उन्नती सोयाबीन बियाण्यांच्या उगवणीबाबत निर्माण झालेल्या तक्रारींनी शेतकरी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मोठ्या विश्वासाने कर्ज काढून पेरणी करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी अपेक्षित उगवण न झाल्याचा आरोप करत तालुका कृषी कार्यालयाकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. तातडीने पंचनामे, शेतांची प्रत्यक्ष पाहणी, बियाण्यांची प्रयोगशाळेत वैज्ञानिक तपासणी करून दोष निश्चित करावा आणि जबाबदारांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

प्रकाश विठ्ठल पातुर्डे, शंकर पूर्णाजी कुरवाडे, दिलीप मानसिंग छळकर यांच्यासह



बाधित शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बियाणे, खते, मशागत, मजुरी, इंधन आणि पेरणीवर मोठा खर्च करूनही अपेक्षित उगवण झाली नाही. परिणामी अनेकांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले असून आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

दरम्यान, या प्रकरणावर सोशल मीडियात विविध दावे-प्रतिदावे सुरू असल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र शेतकऱ्यांचे म्हणणे स्पष्ट आहे— सत्य केवळ वैज्ञानिक तपासणी आणि अधिकृत पंचनाम्यातूनच समोर येऊ शकते.

### शेतकऱ्यांचा संताप

**प्रकाश विठ्ठल पातुर्डे :**"मोठ्या अपेक्षेने कर्ज काढून पेरणी केली; मात्र अपेक्षित उगवण झाली नाही. प्रत्येक बाधित शेताची निष्पक्ष तपासणी करून सत्य समोर आणावे."

**शंकर पूर्णाजी कुरवाडे :**"या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई व्हावी आणि शेतकऱ्यांना न्याय मिळावा."

**दिलीप मानसिंग छळकर :**"फक्त पंचनामा पुरेसा नाही. प्रयोगशाळेत वैज्ञानिक तपासणी झाल्यासच वस्तुस्थिती स्पष्ट होईल."

### पारदर्शक चौकशीची मागणी

वानखेडसह परिसरातील नागरिकांनी प्रशासनाने कोणताही दबाव किंवा पक्षपात न ठेवता निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी केली आहे. दोषी आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार नुकसानभरपाई द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीशी संबंधित अशा गंभीर तक्रारींकडे दुर्लक्ष न करता वेळेत, वैज्ञानिक पद्धतीने आणि पारदर्शक चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष प्रशासनाच्या अधिकृत चौकशी अहवालाकडे लागले आहे.

# खामगावात 12 जुलै रोजी भव्य 'युवा संगम'चे आयोजन

प्रतिनिधी १० जुलै

**खामगाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त खामगाव नगर व खंड यांच्या वतीने १६ ते ३५ वर्षे वयोगटातील युवकांसाठी 'युवा संगम' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, १२ जुलै २०२६ रोजी दुपारी १ ते ५ या वेळेत श्री हरी लॉन्स, सुटाळा बु., खामगाव येथे होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते नितीन जांभोरकर, नागपूर यांची उपस्थिती राहणार आहे.

राष्ट्रनिर्माणात युवकांचा सक्रिय सहभाग वाढावा, नेतृत्वगुणांचा विकास व्हावा तसेच राष्ट्र, समाज आणि संस्कृतीविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमात साहसिक खेळ, संघ परिचय, विविध राष्ट्रीय सामाजिक व सांस्कृतिक विषयावरील संवाद, प्रेरणादायी मार्गदर्शन, तसेच राष्ट्र प्रथम भाव जागरण व संकल्प असे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या माध्यमातून युवकांना विचारांची दिशा, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रकार्यात सहभागी होण्याची प्रेरणा मिळणार आहे.

या कार्यक्रमासाठी १६ ते ३५ वयोगटातील सर्व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, तसेच QR कोडद्वारे नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, खामगाव नगर व खंड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सखोल मतदार पूननिरीक्षण मोहीम

## बीएलओ कडुन घरोघरी जाऊन पडताळणी, नागरिकांनी अचूक माहिती देण्याचे डॉ. रामेश्वर पुरी यांचे आव्हान

प्रतिनिधी १० जुलै

**खामगाव :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिम वेगात सुरू असुन, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बी एल ओ घरोघरी भेट देऊन मतदाराची माहिती पडताळण्याचे काम नियोजनबद्ध पद्धतीने करत आहेत गणना प्रपत्र भरून घेण्यासह पात्र मतदारांची माहिती अचूकपणे नोंदण्यावर भर दिला जात आहे. उपविभागीय अधिकारी डॉ.रामेश्वर पुरी यांच्यासह तहसिलदार सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी पर्यवेक्षक आणि व्हीएलओ यांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून वरिष्ठ अधिकारी विविध भागांना भेटी देऊन मोहिमेचा आढावा घेत असून आवश्यक त्या सूचना देत आहेत मोहिमेदरम्यान बीएलओ नागरिकांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेत आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देत असून माहिती द्यावी तसेच प्रपत्रातील माहितीची खातरजमा करून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी डॉ रामेश्वर पुरी यांनी केले आहे.

# बोगस बियाण्यांची नुकसान भरपाई कंपन्यांनी द्यावी - माजी आ.रायमुलकर

प्रतिनिधी १० जुलै

**मेहकर :** कृषी सेवा केंद्रांमधून अनेक कंपन्यांचे सोयाबीन व इतर वाणाचे घेतलेले बियाणे पेरणी केल्यानंतर उगवून आले नाही, अशा तक्रारी मेहकर व लोणार तालुक्यातील अनेक गावांमधून येत आहेत. कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारी स्वीकारून संबंधित बोगस बियाणे शेतकऱ्यांना दिलेल्या बियाणे कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे काम कृषी विभागाने करावे, अशी मागणी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केली आहे.

काही भागांमध्ये बूस्टर, इनोवेज, महादेव यासह इतरही कंपन्याचे सोयाबीन व इतर वाणांचे बियाणे पेरणी केल्यानंतर उगवून आले नाही अशी सध्या ओरड आहे. मेहकर लोणार तालुक्यातील काही गावांमधील शेतकऱ्यांनी कृषी सेवा केंद्रांमधून खरेदी केलेले बियाणे पेरणी केल्यानंतर उगवून आले नसल्याच्यातक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत, ही अतिशय गंभीर बाब असल्याचे संजय रायमुलकर यांनी म्हटले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे खरेदी करून जास्तीचा खर्च करून दुबार पेरणी करावी लागते. पेरणीला झालेल्या विलंबामुळे झडीतावर त्याचा परिणाम होतो. भ्रमक प्रचार करणाऱ्या काही कंपन्यांवर शेतकरी विश्वास ठेवून बियाणे खरेदी करतात.

# एचएसआरपी नसलेल्या 95 वाहनांवर दंडात्मक कारवाई

## डीआरटीओकडून १ जुलैपासून २८५ वाहनांची तपासणी

प्रतिनिधी १० जुलै

**खामगाव :** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयांतर्गत उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक (एचएसआरपी) नसलेल्या वाहनधारकांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. १ जुलैपासून आतापर्यंत २८५ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, एचएसआरपी नंबरप्लेट नसलेल्या ९५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. खामगाव कार्यालय अंतर्गत एकूण ५० हजार ३१२ वाहने नोंदणीकृत आहेत. यापैकी १९ हजार ६७३ वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यात आली आहे. तर ३० हजार ६३९ वाहनधारकांनी अद्याप एचएसआरपी नंबरप्लेट बसविलेली नाही. एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यासाठी शासनाकडून ३० जूनपर्यंत मुदत देण्यात आली होती; मात्र मुदतीत नंबरप्लेट न बसविणाऱ्या वाहनधारकांवर आता दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. संबंधित वाहनधारकांनी तातडीने एचएसआरपी नंबरप्लेट बसवून नियमांचे पालन करावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.

# उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांनी काळेगाव व ढोरपगाव येथे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कामाची केली पाहणी

प्रतिनिधी १० जुलै

**खामगाव:** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमांतर्गत दि. ७ जुलै २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांनी काळेगाव व ढोरपगाव येथे भेट देऊन सुरू असलेल्या SIR अभियानाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी त्यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) तसेच नागरिकांशी संवाद साधून विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत माहिती जाणून घेतली. कामकाजादरम्यान येणाऱ्या अडीअडचणी समजून घेऊन त्यावर आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच प्राप्त अर्जांचे ऑनलाइन Enumeration कशा पद्धतीने करावे, याबाबत BLO यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर माहिती देत कामकाज अधिक प्रभावी व अचूकपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या.

यानंतर डॉ. पुरी यांनी काळेगाव येथील तलाठी कार्यालयास भेट देऊन महसुली कामकाजाचा आढावा घेतला. नागरिकांची प्रलंबित कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने निकाली काढण्याच्या तसेच नागरिकाभिमुख सेवा अधिक प्रभावीपणे देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या दौऱ्यावेळी मंडळ अधिकारी श्री रामदास चौधरी, ग्राम महसूल अधिकारी श्री ए. एस. शिंदे, पोलीस पाटील श्री गोपाल पांडुरंग बोदडे, माजी सरपंच पती श्री विलास इंगळे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# जलवाहिनी फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत

प्रतिनिधी १० जुलै

## विकास कामांदरम्यान मुख्य जलवाहिन्यांचे नुकसान

**खामगाव:** शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांदरम्यान पाणीपुरवठ्याच्या मुख्य जलवाहिन्या वारंवार फुटत असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जलवाहिनी फुटण्याच्या घटनांमुळे लाखो लिटर पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होत असून, शहराचा पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत आहे.

शहरातील विविध ठिकाणी बुधवारी (८ जुलै) पाणीपुरवठ्याची जलवाहिनी फुटल्यामुळे वायननगर आणि घाटपुरी टाकीवरील पाणीपुरवठा बाधित झाला होता. त्यानंतर गुरुवारी (९ जुलै) घाटपुरी जलकुंभाजवळील ४०० मिमी व्यासाची मुख्य जलवाहिनी गळती झाली.

त्यामुळे घाटपुरी टाकीवर अवलंबून असलेल्या भागातील पाणीपुरवठा पुन्हा विस्कळीत झाला. त्यामुळे पावसाळ्यातही नागरिकांना पाणीटंचाईचे चटके बसताहेत.दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असले तरी पावसामुळे या कामात अडचणी येत आहेत.

पर्यवेक्षक सूरजसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी जलवाहिनी दुरुस्त करण्यासाठी कार्यरत आहेत.

### दोन दिवसांत सलग जलवाहिनी फुटण्याच्या घटना

बुधवारी वामननगर आणि घाटपुरी टाकीवरील पाणीपुरवठा पाइपलाइन फुटल्याने प्रभावित झाला. त्यानंतर गुरुवारी घाटपुरी जलकुंभाजवळील ४०० मिमी मुख्य जलवाहिनी गळती झाल्याने नागरिकांना पुन्हा पाणीटंचाईचा सामना करावा लागला.

### घाटपुरी टाकीवरील भाग सर्वाधिक प्रभावित

घाटपुरी टाकीवर अवलंबून असलेल्या शहरातील विविध भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. काही भागांत नियोजित वेळेत पाणी न मिळाल्याने नागरिकांना पर्यायी पाण्याच्या स्रोतांचा आधार घ्यावा लागत आहे.हरी फैल परिसरातही पाणीपुरवठ्याच्या जलवाहिनीला गळती लागल्याचे निदर्शनास आले आहे. या गळतीमुळे परिसरात पाणी साचत असून पिण्याच्या पाण्याचा अपव्यय होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.



























































हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135